04-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A 1
DGS/ KGS/ MAP/ 13:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**प्रश्नोत्तरे**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

ता.प्र.क्र. 17340

(श्री. हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता)

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, शासनाने छापल्याप्रमाणे काय उत्तर दिले आहे ते मी आपल्याला वाचून दाखवितो. "सदर प्रकरणी शासन स्तरावर निर्णय घेण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर त्याची तपासणी करुन जागेसंबंधात ग्रामविकास विभागास योग्य ती शिफारस करण्यात येईल" अशाप्रकारचे उत्तर दिले. सभापती महोदय, 20 मार्च 2006 च्या तारांकित प्रश्नाला जे उत्तर दिले होते तसेच उत्तर आज दिलेले आहे. त्यामध्ये एका शब्दाचाही फरक नाही, कानामात्र्याचा फरक नाही. त्या अगोदर 7 डिसेंबर 2005 रोजी विचारलेल्या प्रश्नाला जसे उत्तर दिले होते, अगदी तसेच उत्तर दिलेले आहे. माझे असे म्हणणे आहे की, आपले हे शिक्षणाधिकारी एवढे भारी आहेत कां? तुमच्याकडे इतक्या क्षुल्लकपणे ते पहातात कां? तुम्हाला उत्तर पाठविण्याची देखील त्यांना गरज वाटत नाही कां? आणि जर पाठविण्याची गरज वाटत नाही तर मग असे उत्तर पाठविले कशाला? सभापती महोदय, हे सर्व हास्यापद स्वरुपाचे उत्तर आहे. 9 जुलै 1986 ला प्रश्न विचारला त्यावेळी उत्तर दिले की, ही इमारत त्यांच्या मालकीची करण्यात येईल. कारण ही जागा जिल्हा परिषदेच्या मालकीची आहे. आता ती जागा जिल्हा परिषदेकडे नाही हे खरे आहे काय? नसेल तर त्यांच्याकडे पुन्हा प्रस्ताव कां पाठविला? याचे उत्तर आपण दिले पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 1938 पासून मूर्तिजापूर हायस्कूल, मूर्तिजापूर ही अकोला एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलची इमारत आहे. त्या काळात सी.पी. अँड बेरार हे राज्य होते, त्यावेळी ती इमारत जशीच्या तशी शासनाकडे हस्तांतरीत करण्यात आली आणि शासनाने ती जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केली. ही जिल्हा परिषदेच्या मालकीची इमारत जिल्हा

श्री. हसन मुश्रीफ... ता.प्र.क्र. 17340

परिषदेने भाडयाने दिली आहे काय? यासंबंधीचा अहवाल आलेला नाही, तो अहवाल मागवून घेण्यात येईल. जिल्हा परिषदेची इमारत भाडयाने द्यावयाची की नाही यासंबधी ग्राम विकास विभागाने निर्णय घ्यावयाचा आहे. त्यासंबंधी लवकरात लवकर त्यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माझ्या पहिल्या प्रश्नाचे3 उत्तर देण्यात आले नाही. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर हायकोर्टाच्या निर्णया विरोधात आहे. मी याठिकाणी सर्व कागदपत्रे घेऊन बसलो आहे. माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे हे त्या भागातील जाणकार व्यक्ती आहेत. आपण माझ्या पहिल्या प्रश्नाला उत्तर दिले नाही.आपले शिक्षणाधिकारी एवढे भारी आहेत कां? गेल्या दीड वर्षामध्ये तिन्ही प्रश्नांना तेच तेच उत्तर दिले आहे ही फार मोठी लाजिरवाणी गोष्ट वाटते. निदान आता तरी योग्य उत्तर देणे आवश्यक होते. दुसऱ्या प्रश्नाला दिलेले उत्तर पूर्णपणे चुकीचे व असत्य आहे. ही जिल्हा परिषदेच्या मालकीची इमारत नाही, यासंबंधी त्यांनी दिलेले निवेदन तुम्हाला मिळाले आहे. त्या निवेदनाला त्यांनी हायकोर्टाच्या निर्णयाची प्रत जोडली आहे. हायकोर्टाच्या निर्णयामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, "The premises where the Petitioner-Society is running the school, actually belongs to the State Government and the said premises are in occupation of the Petitioner-Society as a tenant. Therefore, it is just a misconception to say that the property namely the school building vests in Zillha Parishad, Akola. Merely because the Petitioner-Society was paying rent to Zilla Parishad, Akola does not make the Zilla Parishad Akola as the owner of the school building. The property therefore continues to vest in the State Government." असे झाले आहे की, ज्यावेळी शासनाला शक्य नव्हते त्यावेळी मध्यप्रदेश शासनाने ती इमारत आणि प्रिमायसेस त्यांच्या ताब्यात दिले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (पुढे सुरु...

ही संस्था 1927 साली स्थापवन झाली. या सस्थेने आपला विस्तार केलेला नाही. परंतु अकोला आणि मूर्तीजापूर भागामध्ये उत्तम शाळा चालविलेली आहे. नामांकित अशा प्रकारची शाळा आहे. माझा प्रश्न असा आहे की, इमारत ताब्यात देताना 239 रुपये दुरुस्तीसाठी मंजूर करुन ताब्यात द्या असे सांगितले होते. माझ्या पहिल्या प्रश्नाला उत्तर दिलेले नाही. दुसऱ्या प्रश्नाला संपूर्णपणे असत्य उत्तर दिलेले आहे. म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, जिल्हापरिषदेचे शिक्षणाधिकारी एवढे भारी आहेत काय ? त्यांनी दीड-दोन वर्षे उत्तर दिलेले नाही, त्यांच्यावर काय ॲक्शन घेणार आहात ? मी हायकोर्टाचा निर्णय नंतर सांगतो. त्यावेळेला माननीय श्री.चव्हाण साहेबांनी 1962 मध्ये जी.आर. काढून इचलकरंजीच्या शाळांच्या जागा त्यांना कायमस्वरुपी ताब्यात देण्याबाबत मंजुरी दिलेली होती. विदर्भातील या शाळेच्या इमारतीच्या अनुषंगाने दोन फॉर्म जोडलेले होते. माझ्या दोन प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांनी द्यावीत.

श्री.हसन मुश्रीफ : शिक्षणाधिकाऱ्यांनी अहवाल पाठविला नाही त्याबाबत त्यांच्यावर ताबडतोबीने कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेबांनी एकंदर चार वेळा प्रश्न आपल्यासमोर चर्चेला आणला. 1986 ला आपण उत्तर देताना असे सांगितले आहे की," The property vests in the Zillha Parishad." हे बरोबर आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : दिनांक 21/2/1986 ला कळविले की, ही जागा देऊ शकत नाही. त्यानंतर 9 जुलै 1986 मध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आला, त्याचे उत्तर दिलेले आहे. त्यानंतर दिनांक 6 सप्टेंबर 2005 मध्ये संस्थेने मुख्य सचिवांकडे अर्ज केला. एकदा ही जागा देऊ शकत नाही, असे कळविल्यानंतर पुन्हा हायकोर्टाचा निर्णय झाला, असे सांगून सन्माननीय सदस्यांनी इचलकरंजी येथील शाळांच्याबाबतीत शासनाने निर्णय घेतल्याचे सांगितले. तसा हायकोर्टाने निर्णय दिला असेल तर तो तपासून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मूर्तीजापूर शहर हे आमच्या अकोला जिल्ह्यामध्ये आहे. ही शैक्षणिक संस्था नावाजलेली आहे. याबाबत सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेबांनी सांगितले. त्या शाळेला जागा ताब्यात देण्याचा प्रश्न शिक्षण विभाग आणि ग्राम विकास विभाग यांच्याकडे प्रलंबित आहे. या विषयाच्या संबंधात जोपर्यन्त दोन्ही विभागांच्या बैठका होणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

ता.प्र.क्र.17340 (पुढे सुरु...

श्री.सुधाकर गणगणे (पुढे सुरु....

नाहीत, तोपर्यन्त प्रश्न सुटणार नाही. हे अधिवेशन संपण्यापूर्वी या संबंधित विभागांची बैठक बोलावून हा प्रश्न निकाली काढला जाईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : मी मघाशी याबाबतीत सांगितले. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि सनमाननीय सदस्य श्री सुधाकर गणगणे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सन्माननीय सदस्यांनी हायकोर्टाच्या निर्णयाचा उल्लेख करुन पश्चिम महाराष्ट्रातील इचलकरंजी आणि अन्य ठिकाणच्या शाळांच्याबाबतीत निर्णय केल्याचे सांगितले. तो निर्णय तपासून घेऊन याबाबत उचित निर्णय घेतला जाईल.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मी हरकतीचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो. दिनांक 15 जून रोजी शिक्षणाधिकाऱ्यांनी पाठविलेला अहवाल शिक्षण खात्याला 22 जून रोजी मिळालेला आहे. असे असताना अद्याप अहवाल आलेला नाही असे उत्तर दिले जात आहे, हे कसे काय ? 22 जून रोजी शिक्षण खात्याला अहवाल मिळाला असे असताना अद्याप अहवाल मिळाला नाही हे कशाच्या आधारावर सांगत आहात ?

श्री.हसन मुश्रीफ : माझ्यासमोर हा विषय आलेला नाही.

**सभापती** : हरकतीचा मुद्याद्वारे सन्माननीय सदस्यांनी शिक्षणाधिकाऱ्यांचा अहवाल 22 जूनला दिल्याचे सांगितले. याबाबतची वस्तुस्थिती काय आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : माझ्या माहितीप्रमाणे अहवाल मिळालेला नाही.

श्री.सुधाकर गणगणे : शिक्षण विभाग आणि ग्राम विकास विभाग एकमेकांवर जबाबदारी टाकत आहेत.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मंत्रीमहोदय माहिती नाही, असे सांगतात. त्यांच्याकडे माहिती नसेल तर हा प्रश्न रोखून धरावा.

श्री.हसन मुश्रीफ : मी असे म्हटले नाही. माझ्या माहितीप्रमाणे अजून अहवाल मिळालेला नाही,असे मी म्हटलेले आहे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17340 ......

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे प्रश्न यासाठी राखून ठेवला पाहिजे की, हे 10 ऑक्टोबर, 2005 चे निवेदन शासनाला मिळालेले आहे. त्या निवेदनाला हायकोर्टाच्या निर्णयाची प्रत जोडलेली आहे. माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी जर-तर ची भाषा वापरत आहेत. याचा अर्थ त्यांनी ते पाहिलेले नाही. ही बाब आक्षेपार्ह आहे. यामुळे विदर्भावर सातत्याने अन्याय होतो. हा प्रश्न आपण राखून ठेवावा.

श्री. हसन मुश्रीफ : हे निवेदन मुख्य सचिवांकडे मिळालेले आहे....

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, हायकोर्टाचा निर्णय माननीय मंत्रिमहोदयांनी पाहिलेला नाही. सभागृहामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी जे शब्द वापरले ते मी लिहून घेतलेले आहेत. त्यांनी असे सांगितले की, "जर हायकोर्टाचा असा निर्णय झाला असेल तर..." या निवेदनामध्ये त्या विषयाचा परिच्छेद आहे आणि हायकोर्टाचा निर्णय सोबत जोडलेला आहे. आम्हाला न्याय मिळालेला नाही. दीड दोन वर्षे तुम्ही ते निवेदन पाहात नाही. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, आपण हा प्रश्न राखून ठेवावा. माननीय मंत्रिमहोदयांनी हे पहावे. जर-तर असे न म्हणता उत्तर द्यावे.

**सभापती** : हा प्रश्न अनेक दिवस प्रलंबित आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी जी सूचना केलेली आहे त्या अनुषंगाने पुढच्या आठवड्यात माझ्या दालनामध्ये मी आपणा सर्वांच्यासह बैठक घेतो. त्यावेळी दोन्ही विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना मी बोलवतो. संबंधित शालेय शिक्षण मंत्री आणि त्यांचे विभागीय अधिकारी यांनाही आपण बोलवू. सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी याबाबतीत जी विनंती केली होती ती मी मान्य केलेली आहे. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्याचे काही कारण नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण एक मिनिट आमचे म्हणणे ऐकून घ्यावे. माननीय मंत्रिमहोदयांना 1962 चा जी.आर. माहीत नाही. महाराष्ट्रामध्ये एका भागामध्ये काम करणार आणि विदर्भावर मात्र अन्याय होतो. आपण हा प्रश्न राखून ठेवावा. माननीय मंत्रिमहोदय हायकोर्टाचा निर्णय पाहणार नाहीत, 1962 चा जी.आर. पाहणार नाहीत, महाराष्ट्रातील इतर शिक्षण संस्थांना वेगळा न्याय देणार आणि या ठिकाणी दीड वर्षे काही होत नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

ता.प्र.क्र. 17340 ......

**THE CHAIRMAN**: I would request the hon. Member, Shri B.T. Deshmukh to please sit down. Whether the Hon. Minister of State Shri Vasantraoji Purke wants to say something on this point?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, खरे म्हणजे या जागेत खाजगी संस्था शाळा चालवित आहे. त्या ठिकाणी के.ई.एम. हायस्कूलसाठी जागेची मागणी केलेली आहे. तो प्रस्ताव अमान्य केलेला आहे. ही जागा देता येणार नाही.

श्री. प्रमोद नवलकर : प्राप्त झालेला अहवाल कोठे आहे ? शासन म्हणते की, ते माहीत नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यामध्ये दोन भाग आहेत. सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर हे शिक्षण अधिकाऱ्यांच्या अहवालासंबंधी सांगत आहेत आणि सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे हायकोर्टाच्या निर्णयासंबंधी सांगत आहेत. सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे बैठक घेऊ.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्याची गरज का आहे हे माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितलेले नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी या ठिकाणी मला विनंती केली तसेच आपणा सर्वांच्या भावना माझ्यासमोर आहेत. त्यादृष्टीने पुढच्या आठवड्यामध्ये माझ्या दालनामध्ये या प्रश्नावर सखोल चर्चा करण्याची व्यवस्था करतो. हा प्रश्न राखून ठेवण्याची आवश्यकता पडणार नाही. यानंतर पुढचा प्रश्न घेण्यात येईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी हायकोर्टाचा निर्णय न पाहता....

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 13:15

(ता. प्र.क्र. 17340...)

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय मंत्री महोदय असत्य माहिती देत आहेत.

**सभापती** : या प्रश्नासंबंधी माझ्या दालनात बैठक घेण्यात येईल, असा निर्णय मी दिलेला आहे. आता मी पुढील प्रश्नाकडे वळतो.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाला न्याय न मिळाल्यामुळे आम्ही निषेध व्यक्त करुन सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 19151**

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आज मुंबई परत एकदा पाण्यामध्ये बुडालेली आहे. रेल्वे बंद पडलेली आहे. रेल्वे गाड्या कुर्ल्याच्या पुढे धावत नाहीत. आणखी एखाद्या तासाने या मुंबईचे व्यवहार ठप्प झालेले असतील अशी परिस्थिती आज मुंबईमध्ये निर्माण झालेली आहे. त्याला प्रामुख्याने मिठी नदी हे कारण आहे, हे अमान्य करुन चालणार नाही. मिठी नदीने मागील वर्षी 26 जुलैला मुंबईमध्ये हाहाकार उडविला होता.

**सभापती** : माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मिठी नदीच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहाण्याची गरज आहे. 1987चा परांजपे समितीचा अहवाल, 1992चा सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ फिशरिजने एमएमआरडीएला दिलेला अहवाल, 1993चा मँग्रूव्ह समितीचा अहवाल आणि 1997चा केन्द्र सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने दिलेला अहवाल, या चारही अहवालांमध्ये मिठी नदीचे चानलायझेशन कराता येणार नाही असे स्पटपणे म्हटलेले आहे. तरी देखील मागील 35-40 वर्षाच्या कालावधीत मिठी नदीचे चॅनलायझेशन करण्यात आले. मिठी नदीमध्ये भराव टाकून बांधकामे करण्यात आली. अमेरिकेतील न्यूयॉर्कमध्ये दलदलीमध्ये इमारती बांधल्यामुळे तेथे पाणी साचले होते. त्यामुळे न्यूयॉर्क म्युनिसिल कौन्सिलने दोन वर्षाच्या काळात त्या दलदलीच्या भागातील सर्व इमारती पाडून पुन्हा दलदल निर्माण केली.

**सभापती** : माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. जितेंद्र आव्हाड : माझा प्रश्न असा आहे की, 35 वर्षापूर्वी मिठी नदीची जी लांबी, रुंदी आणि खोली होती ती तशीच पूर्ववत करण्यात येईल काय ? मिठी नदीच्या 50 मीटर परिसरात असलेली अनधिकृत बांधकामे किती दिवसात निष्कासित करण्यात येतील ?

श्री. गणेश नाईक : गेल्या वर्षी 26 जुलैला मिठी नदीला महापूर आलेला होता. ही मिठी नदी विहारच्या परिसरामध्ये उगम पाऊन मुंबईच्या अनेक भागातून वाहून समुद्राला मिळते. या नदीच्या पात्राच्या दोन्ही बाजूस काही निवासी गाळे, काही व्यापारी गाळे आणि काही औद्योगिक गाळे बांधले गेले. त्यामुळे मिठी नदीचे पात्र अरुंद झालेले आहे ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. त्या समितीमध्ये महसूल विभाग, मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए आणि

..3..



MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 13:15

(ता.प्र.क्र. 19151...) (श्री. गणेश नाईक...)

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ असे चार विभाग असून या चार विभागांवर या मिठी नदीच्या संदर्भातील जबाबदारी सोपविण्यात आली. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने 825 कारखान्यांना नोटीसा दिलेल्या आहेत. तसेच 110 औद्योगिक वसाहतींना नोटीसा दिलेल्या आहेत. या पैकी ब-याच घटकांचे पाण्याचे कनेक्शन तसेच वीज कनेक्शन तोडण्यात आलेले आहे. 3 हजार निवासी गाळे आणि 512 व्यापारी गाळे तोडण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. 5 लाख 60 हजार क्यूबिक मीटर इतका गाळ काढण्यात आलेला आहे. त्यासाठी महानगरपालिकेने 32 कोटी रु. खर्च केलेले आहेत. नदीचे पात्र 10 मीटर रुंद करुन ते 40 मीटर करण्यात आलेले आहे. पात्राची खोली दीड मीटरने वाढवण्यात आलेली आहे. ज्या ज्या घटकांवर या मिठी नदीच्या संदर्भातील जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे ते घटक आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडीत आहेत. नजिकच्या भविष्यकाळात या मिठी नदीच्या बाबतीत अधिक सुधारणा होऊन त्याठिकाणी वस्ती वाढणार नाही तसेच नदीच्या पात्रात गाळ जमा होणार नाही या बाबीवर नियंत्रण ठेवले जाईल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 13:20

श्री.गणेश नाईक...................... ता.प्र.क्र.19151....

आणि जी पूरसदृश परिस्थिती गेल्या कालखंडात झाली तशी होणार नाही यादृष्टीने शासन निश्चितपणे काम करीत आहे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, सर्वेक्षणामध्ये किती कारखाने अनधिकृत व नियमाचे पालन न करणारे आढळले आणि त्यांच्यावर कोणती कारवाई केली जाईल व त्यासाठी किती काळ लागेल?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, संमती पत्र न घेतलेल्या 146 उद्योगांवर कायदेशीर कारवाई केली असून भविष्यकाळात त्याठिकाणी अशा प्रकारची अनधिकृत बांधकामे कोणताही उद्योग करणार नाहीत याची दक्षता घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सर्व अनधिकृत बांधकामे काढून टाकण्यात आली आहेत असे उत्तर मंत्रीमहोदयांनी दिले आहे. 8 दिवसांपूर्वी यासंदर्भात पुन्हा तेथे अनधिकृत बांधकामे झाल्याचे हायकोर्टाच्या निदर्शनास आले, ती बांधकामे तातडीने काढण्याचे आदेश दिले. त्या संदर्भातील वृत्तान्त वाहिन्यांवर दाखविण्यात आले. अशी किती बेकायदेशीर बांधकामे तोडण्यात आली, त्यांची संख्या किती आणि पुन्हा अशी अतिक्रमणे करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली जाईल?

श्री.गणेश नाईक : त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे झाली का असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. शासनाच्या माहितीप्रमाणे अनधिकृत बांधकामे झालेली नाहीत. भविष्यकाळात याठिकाणी अनधिकृत बांधकामे उभारली जाणार नाहीत यासाठी यंत्रणा उभारली आहे. या नदीतील गाळ काढणे, पात्र रुंद करणे, पात्राच्या दोन्ही बाजुला असलेल्या नागरी वसाहती, औद्योगिक वसाहती या नाहिशा करण्यासाठी यंत्रणा परिपूर्ण काम करीत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 828 उद्योग व 110 औद्योगिक वसाहतींविरुध्द कारवाई केली आहे. जी कारवाई केली तिचे स्वरुप काय आहे? ते कारखाने कायमस्वरुपी बंद केले की तात्पुरते बंद केले?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, काही कारखान्यांना दिलेला वीज पुरवठा खंडित करण्याचे आदेश रिलायन्स एनर्जीला दिले. काहींना दिलेला पाणीपुरवठा बंद करण्यास महापालिकेला सांगितले. जी अनधिकृत बांधकामे होती ती तोडण्यात आली आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 13:20

ता.प्र.क्र.19151.....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या मिठी नदीवरील अतिक्रमणे हा एक विनोदाचा विषय झाला आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, आमची यंत्रणा सज्ज आहे, आम्ही लक्ष ठेवले आहे. कोणीही अतिक्रमणे केली तर ती ताबडतोब काढण्याची व्यवस्था केली आहे. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे, जी अतिक्रमणे काढली ती पुन्हा नव्याने उभी राहिली आहेत. याची माहिती मंत्रीमहोदयांना कोणी देत नाही. सुरूवात करावयाची असेल तर सत्ताधारी पक्षात बसलेले सन्माननीय मंत्री श्री.बाबा सिद्दीकी यांच्याच नावाचे सिद्दीकी नगर म्हटले जाते, ती झोपडपट्टी मिठी नदी समुद्रामध्ये प्रवेश करते त्या तोंडावर आज सकाळी पुन्हा उभी राहिली आहे. आपली यंत्रणा काय काम करते? ही अतिक्रमणे पुन्हा होणार असतील तर मिठी नदीचे पूर्वीचे स्वरुप होते तसे पुन्हा होईल. यादृष्टीने कोणती कारवाई केली जाईल आणि ती यंत्रणा कोणती आहे, त्या यंत्रणेचा संपर्क दूरध्वनी क्रमांक कोणता आहे?

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की या ठिकाणी अतिक्रमणे होत आहेत. शासनाची माहिती अतिक्रमणे नाहीत अशी आहे. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी जी माहिती सांगितली ती सत्य समजून त्याठिकाणी खरोखर अतिक्रमणे होत असतील तर आजच्या आज निदेश देऊन ती बांधकामे निष्कासित करण्याची कारवाई करण्यात येईल.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 19151...

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स मिठी नदीच्या मुखावर अतिक्रमण करुन केलेले आहे काय? जर हे बांधकाम अतिक्रमण करुन केले असेल तर त्यावर काय कारवाई करण्यात येईल?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स हे मिटी नदीच्या मुखावर नसून बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्सच्या जवळून मिठी नदी वाहते.

श्री. प्रमोद नवलकर : मिठी नदीवरील अतिक्रमण उठविण्याचे काम कार्यक्षमतेने चालू आहे परंतु आतापर्यंत जे काही अतिक्रमण काढावयाचे राहिलेले आहे त्यामध्ये एकंदर अनाधिकृत बांधकामे किती आहेत? गाळ किती आहे तसेच मिठी नदीमध्ये पाणी किती शिल्लक आहे?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, या ठिकाणी 300 निवासी गाळे तसेच 552 व्यापारी व्यापारी गाळे हटविण्यात आले तसेच या ठिकाणावरुन 5.60 लक्ष घ.मी. गाळ काढण्यात आलेला असून मिठी नदीमध्ये पाणी किती शिल्लक आहे यांचा अंदाज येत नाही.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : माननीय सभापती महोदय, मिठी नदीचे पात्र रिकामे करण्यासाठी हायकोर्टाने निर्देश दिल्याप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. मघाशी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, अतिक्रमण हटविण्याचे काम सुरु आहे परंतु दुसरीकडे पुन्हा मिटी नदीवर अतिक्रमण होत आहे. माहिम येथे नदीच्या मुखावर पुन्हा झोपडया आलेल्या आहेत यासंदर्भात शासनाकडे काही माहिती आलेली आहे काय?

श्री. गणेश नाईक : माहिम येथे नदीच्या मुखावर पुन्हा झोपडया तयार झालेल्या आहेत अशा प्रकारची माहिती आमच्याकडे आलेली नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी समजून संबंधित यंत्रणेला अतिक्रमण तोडण्याची जबाबदारी सोपविण्यात येईल व त्या प्रमाणे या झोपडया निष्कासित करण्यात येतील.

ॲड. अनिल परब : मिठी नदीच्या पात्रावर जे अतिक्रमण झाले होते त्यासंदर्भात सर्व्हेक्षण करण्यात आले होते. परंतु या ठिकाणच्या निवासी गाळयात, झोपडपट्टीत जे लोक राहत होते त्यांना गुंडाकडून बळजबरीने हुसकावून देण्यात आले व त्या ठिकाणी व्यापारी गाळे,उद्योग काढण्यात आले. त्यामुळे अशा प्रकारचे घटना आढळून आल्या तर त्यांच्यावर किती दिवसात व कोणती कारवाई केली जाणार आहे?

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 19151...

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, जर निवासी गाळयांचा आधार घेऊन त्या ठिकाणी उद्योग सुरु असतील तर ते उद्योग लगेच बंद करण्यात येतील.

डॉ. दीपक सावंत : माननीय सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये सांगण्यात आले आहे की, आतापर्यंत अनाधिकृत व प्रदुषण नियमांचे पालन न करणा-या 828 उद्योग व 110 ओद्योगिक वसाहतीविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी एकंदर अनाधिकृत बांधकामे किती आहेत? तसेच माहिम येथे झोपडपट्टी तयार झालेली आहे त्यामुळे या ठिकाणी आपण स्वत: जाऊन त्याचे सर्व्हेक्षण करणार आहात काय? तसेच या ठिकाणी सांगण्यात आले आहे की, पहिल्या टप्प्यात मिठी नदीच्या पात्रापासून 30 मी. अंतरापर्यंत अनाधिकृत बांधकामे तोडण्याची कार्यवाही चालू आहे परंतु पुढच्या भागावरील अतिक्रमणे तोडण्याच्या संदर्भात काय उपाययोजना केली जाणार आहे?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माहिम येथे नव्याने झोपडपट्टी तयार होत असेल तर तिचे निष्कासन करण्याचे संबंधित एजन्सीला सांगण्यात येईल. तसेच मी स्वत: या प्रश्नाच्या संदर्भात लक्ष घालेन. तसेच माहिमच्या ठिकाणी नदीचे पात्र रुंद करण्यात आलेले असून पुढच्या पावसाळयात बहुतांशी काम पूर्ण केले जाईल. या ठिकाणी अनाधिकृत बांधकामे, उद्योग, झोपडपट्टया उभ्या राहणार नाहीत तसेच या ठिकाणी कोणतेही डेब्रीज शिल्लक राहणार नाही एवढे या निमित्ताने सांगतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 19151..........

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले नाही....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, मी आपणास पुन्हा संधी देईन.

श्री.वसंतराव चव्हाण : सभापती महोदय, मुंबई शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या अशा मिठी नदीबाबतचा प्रश्न याठिकाणी चर्चेला आलेला आहे. 35 वर्षापूर्वी मिठी नदीचे पात्र किती खोल व रुंद होते त्याचा रेकॉर्ड महानगरपालिकेकडे उपलब्ध असेलच. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, 35 वर्षापूर्वी मिठी नदीचे जे पात्र होते ते पूर्ववत होईल काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मिठी नदीत पावसाचे पडणारे पाणी तसेच मिठी नदीच्या सभोताली असलेले उद्योग आणि औद्योगिक वसाहतीतील पाणी मिठी नदीत सोडले जाते. आता मिठी नदीच्या पात्रातील गाळ काढण्यात आला असून नदीची खोली वाढविण्यात आलेली आहे. 26 जुलै 2005 रोजी जो अभूतपूर्व पाऊस झाला त्याची पुनरावृत्ती झाल्यास पाणी वाढण्याची शक्यता आहे. परंतु नियमित पाऊस झाल्यास त्रास होणार नाही याबाबत दक्षता घेतली जाईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मिठी नदीचे पात्र किती रुंद आहे याची माहिती महानगरपालिकेला आहे, असे असताना सुध्दा मिठी नदीच्या सभोतालच्या 30 फुट अंतरावरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याचे ठरविण्यात आले. मिठी नदीच्या परिसरात अनधिकृत व प्रदूषण नियमांचे पालन न करणारे उद्योगधंदे किती ? या दोन प्रश्नाचे एकत्रिपणे उत्तर देण्यात आलेले आहे व पुढे उत्तरात असे म्हटलेले आहे की, 110 औद्यागिक वसाहतींविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, 828 मधील अनधिकृत बांधकामे किती व प्रदूषण नियमांचे पालन न करणारे उद्योगधंदे किती ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, नियमांचे पालन न करणारे आणि अनधिकृत असलेले असे एकूण 828 उद्योग आहेत. तसेच 110 औद्योगिक वसाहतीविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. ज्या वसाहतीमध्ये एकापेक्षा अधिक उद्योग चालतात अशा उद्योगांवर कारवाई करण्यात आलेली आहे. त्याठिकाणी रबर फॅक्टरी, गोल्ड प्लॅटीनम असे अनधिकृत उद्योग सुरु होते त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 13:30

ता.प्र.क्र. 19151.....

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मिठी नदीच्या बाजुला असलेल्या लोकांचे पुनर्वसन केलेले आहे. लोकांचे पुनर्वसन करताना त्यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. ॲन्टी करप्शनच्या अधिकाऱ्यांनी दोन अधिकाऱ्यांना अटक केली हे खरे आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मिठी नदीच्या अतिजवळ असणाऱ्या अधिकृत झोपडपट्टयांचा प्राधान्याने विचार करण्यात येऊन दिनांक 1.1.1995 च्या शासन निर्णयानुसार त्यांचे विविध ठिकाणी पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही लोकांचे पुनर्वसन झालेले नाही. परंतु योग्य जागा मिळताच लवकरात लवकर त्यांचे देखील पुनर्वसन करण्यात येईल.

---------------

यानंतर श्री.पुरी........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 13:35

**(ता.प्र.क्र.17353)**

**(श्री.हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांचेकरिता)**

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, पहिल्याच प्रश्नासारखी याही प्रश्नाची पुनरावृत्ती झ ाालेली आहे. याठिकाणी प्रश्न असा आहे की, राज्यातील वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राहय धरण्यात यावा. याबाबतीत हायकोर्टामध्ये जवळपास 20-25 शिक्षक गेलेले असून याबाबतीत हायकोर्टाने निर्णयही दिलेला आहे. परंतु पाच वर्षे होऊनही याबाबतीत राज्य शासनाने अंमलबजावणी केलेली नाही. यासंदर्भात दिनांक 27.4.2005 रोजी हायकोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार त्यांनाही वरिष्ठ आणि निवडश्रेणीसाठी सेवाकाळ ग्राहय धरण्यात यावा. परंतु याठिकाणी पहिल्यासारखेच या प्रश्नाच्या बाबतीत उत्तर येत आहे, हे योग्य नाही. हा प्रश्न पूर्वी 15-16 वेळा आलेला आहे. पूर्वी ज्यावेळी हा प्रश्न सभागृहामध्ये आला होता त्यावेळी माननीय सभापती महोदय आपण जे निर्देश दिले होते ते मी आपल्याला वाचून दाखवतो. आपण दिनांक 9.12.2005 रोजी या प्रश्नासंबंधी असे निर्देश दिले होते की, "उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची पूर्णत: अंमलबजावणी येत्या एक महिन्यात करावी असा मी शासनाला निदेश देतो." परंतु या निदेशाचे काय झाले ? माननीय सभापती महोदय, आपण निर्देश देऊनही शासन ऐकत नसेल तर आम्ही याठिकाणी आणखी काय करावे ? हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाचे पालनही होत नसेल तर कसे व्हायचे ? सभागृहात बोलताना हा धोरणात्मक निर्णय असल्याचे म्हटले जाते. मग, हा धोरणात्मक निर्णय असेल तर हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे या 25 लोकांना जो न्याय दिला त्याप्रमाणे राज्यातील सर्व शिक्षकांना समानतेच्या न्यायानुसार, न्याय देण्याच्या दृष्टीने येत्या आठवडयात किंवा हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतीतील निर्णय घेतला जाईल का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपल्या निर्देशानुसार आपल्या दालनात बैठक झ ााल्यानंतर एक ते दीड महिन्यात याबाबतीतील प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये घेण्याच्या दृष्टीने सध्या वित्त मंत्री व माननीय मुख्यमंत्री यांच्यापर्यंत हा प्रस्ताव गेलेला आहे. मला खात्री आहे की, मंत्रिमंडळाच्या पुढील एक दोन बैठकीमध्ये याबाबतीत निर्णय होईल.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17353....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हायकोर्टाने वरिष्ठ श्रेणी वा निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृती ही नियमबाहय आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक 14 सप्टेंबर,2000 रोजी एका याचिकेमध्ये (सन 2000 ची याचिका क्रमांक 4346) दिला हे खरे आहे काय ? दिनांक 11 जून,2004 रोजीच्या प्रश्न क्रमांक 36739 ला "होय" असे उत्तर दिले आहे. माननीय सभापती महोदय, यासंदर्भात आपल्या दालनातही बैठक झाली. त्यावेळी आपण यासंदर्भातील सर्व कागदपत्रे पाहून सभागृहामध्ये जो निर्णय दिला तो मी वाचून दाखवतो. आपण असे निर्देश दिले की, "उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केलेले नाही, हे मागच्यावेळी देखील सांगितले आहे. आजही तिच परिस्थिती आहे. सरकारला याबाबतीत अन्य कोणता कायदेशीर सल्ला घ्यायचा असेल तो त्यांनी घ्यावा. परंतु, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची पूर्णतः अंमलबजावणी येत्या एक महिन्यात करावी असा मी शासनाला निदेश देतो." आपल्या दालनात बैठक होण्यापूर्वी आपण असे निर्देश दिले. याठिकाणी आपण दिलेल्या निर्देशाचे व हायकोर्टाने दिलेल्या निर्देशाचेही पालन सरकार करत नसेल तर आम्ही आणखी कुठे जायचे ? त्यामुळे याबाबतीत माझी अशी मागणी आहे की, आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा प्रश्न सभागृहात बऱ्याचदा आला होता. आपल्या दालनामध्ये यासंबंधी चर्चा झाली होती. उच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर मंत्रिमंडळाने याबाबतीत निर्णय घ्यावा असे ठरले. त्यावेळी माननीय देशमुख साहेबांनी असा मुद्दा मांडला होता की, आपणच मंत्रिमंडळापुढे सांगण्यास कमी पडलात, आपल्याला याबाबतीतील बाजू प्रभावीपणे मांडता आली नसेल. हे सर्व मान्य करुन पुन्हा मी याठिकाणी सांगेन की, पुढच्या अधिवेशनामध्ये परत हा प्रश्नच न येण्याच्या दृष्टीने आम्ही काम करु व ही वेतनश्रेणी शिक्षकांना आम्ही मिळवून देऊ.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.17353 पुढे सुरु...........**

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय मंत्री, श्री.पतंगराव कदम, सन्माननीय मंत्री, प्रा.वसंत पुरके व शिक्षण राज्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. त्यांच्या मी हे लक्षात आणून देऊ इच्छितो की, या प्रश्नाच्या अनुषंगाने 3/4 वेळा चर्चा या सभागृहात झालेली आहे. तसेच, माझ्या दालनात देखील चर्चा झालेली आहे. शासनाला यासंदर्भाने जी प्रक्रिया पूर्ण करावयाची असेल ती वस्तुस्थितीला धरुनही असेल. परंतु, ही संपूर्ण वस्तुस्थिती डोळयासमोर ठेवून मी सदनामध्ये यापूर्वीच सूचना दिल्या होत्या. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करुन व मंत्रीमंडळाने निर्णय घेऊन याबाबतीत अंमलबजावणी किंवा कार्यवाही झाली पाहिजे. माननीय राज्यमंत्री यांनी या ठिकाणी असे सांगितले की, पुढच्या अधिवेशनामध्ये हा प्रश्नच येणार नाही. पण मी असे म्हणतो की, या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यन्त या प्रश्नाची सोडवणूक करण्यासंदर्भात तुम्ही प्रयत्न करा तोपर्यन्त मी हा प्रश्न राखून ठेवतो.

--------------------

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.19364</u>**

(श्री.हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता)

श्री.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन 2004-2005 मध्ये महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने जे सर्वेक्षण केले त्या सर्वेक्षणामध्ये आपल्या राज्यातील सुमारे 8 लाख 31 हजार मुले लिहिता-वाचता न येणारी होती, असे या प्रश्नाच्या उत्तरात नमूद केले आहे. त्यासाठी विविध योजना आणि कार्यक्रम राज्य शासनाच्या शिक्षण विभागामार्फत राबविले जात आहेत, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. माझा प्रश्न साधा आणि सोपा आहे. 8 लाख 31 हजार मुलांपैकी किती मुलांना लिहिता-वाचता येऊ लागले आहे ? किती मुलांची शिक्षणाची गुणवत्ता वाढली आहे ? प्रगती झाली आहे ? याचा आढावा मंत्रीमहोदय सांगतील काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय आहे. राज्यातील जवळपास 1 कोटी 36 लाख 766 प्राथमिक शाळांमध्ये मुले शिक्षण घेत आहेत. शासनाने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले आहे व खर्चाची सर्व जबाबदारी शासनाने उचलली आहे. शैक्षणिक प्रगतीचे सर्वेक्षण केल्यानंतर लेखन-वाचन कार्यक्रमामुळे 83 टक्के मुलांना लिहिता व वाचता येऊ लागले आहे. या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढावा म्हणून शासनाने नवीन कार्यक्रम हाती घेतला आहे. 'ध्यास गुणवत्तेचा' ही मोहिम काढली असून विद्यार्थ्यांची गुणवत्ता व दर्जा कसा वाढेल याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, महाराष्ट्राचा शैक्षणिक इतिहास फार मोठा आहे. महर्षि धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणासाठी आपल्या जिवाचे रान केले. त्याच महाराष्ट्रात 8 लाख 31 हजार मुलांना लिहिता-वाचता येत नाही हा एक प्रकारे महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्राचा पराभव आहे, असे दिसते. शासनाचा हेतू उदात्त आहे. तरीही शाळांवर त्याचा वेगळया प्रकारे परिणाम होत आहे. सध्या शाळांमध्ये 8 चाचणी परीक्षा व 2 मुख्य परीक्षा अशा मिळून वर्षभरात 10 परीक्षा होतात व विद्यार्थ्यांना या सर्व परीक्षांना सामोरे जावे लागते. ही विद्यार्थ्यांची तर परीक्षा असतेच परंतु त्यांच्या पालकांचीही परीक्षा पाहिली जाते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या परीक्षांची संख्या कमी करुन विद्यार्थी, पालक व शिक्षकांवरील हे ओझे शासन कमी करणार काय ?

..3........

**ता.प्र.क्र. ता.प्र.क्र.19364 पुढे सुरु............**

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ज्या चाचणी परीक्षा घेतल्या जातात त्याचे स्वरुप असे आहे की, प्रत्येक महिन्याला 1 तासाचा पेपर घ्यावयाचा आणि लगेच तो तपासायचा. यामुळे विद्यार्थ्यांचे मुल्यांकन करता येते. परीक्षा घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांचे मुल्यांकन करता येणार नाही म्हणून परीक्षांची आवश्यकता आहे.

श्री.व्हि.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, गुणात्मक विकासासाठी शिक्षकांना 61 दिवस राबवून घेण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी त्यांना रविवारच्या सुटया, सणांच्या सुटया दिल्या जात नाहीत. या सुटया शिक्षकांना मिळणार आहेत की नाही ? शिक्षकांच्या सार्वजनिक सुटया कमी करण्याचे अधिकार शासनाला आहेत काय ? 61 दिवस अखंडपणे शिक्षकांना काम करावयाचे आहे. शासकीय सुटया आणि रविवारच्या सुटया त्यांना दिल्या जातील काय ?

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र.19364** .........

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा आढावा घेण्यात आलेला आहे. 8,31,075 मुलांना लिहिता वाचता येत नाही. शासनाने गुणवत्ता विकास कार्यक्रम सुरु केलेला आहे. मुलांना आज कोणता वार आहे, 15 + 3 किती होतात अशा प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत. आजचा वार कोणता हे सांगता न येणारी 6,53,140 मुले आहेत. यश अपयश दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही शिक्षकांना रविवारची सुटी दिलेली आहे. ज्या दिवशी शासकीय सुटया आहेत त्या दिवशी स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात येईल, यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अप्रगत विद्यार्थी प्रगत होण्यासाठी गुणवत्ता विकासाचा कार्यक्रम राबविण्यास आमचा पाठिंबा राहणार आहे. अप्रगत विद्यार्थ्यांची जी संख्या दिलेली आहे ती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील आहे. मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांव्यतिरिक्त खाजगी अनुदानित, विना अनुदानित शाळांना गुणवत्ता विकासाचा कार्यक्रम लागू करण्यात आलेला आहे त्याचा सर्व्हे झालेला आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, खाजगी अनुदानित, विना अनुदानित शाळांमध्ये अप्रगत विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, ज्या मुलांची यापूर्वी परीक्षा झाली त्यांचा नव्याने सर्व्हे करण्याची आवश्यकता नाही. सन 2006-07 मध्ये 8 वीच्या विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. खाजगी शाळांमधील अप्रगत विद्यार्थ्यांचा सर्व्हे केला जाईल.

श्री.जी.एल.अैनापूरे : सभापती महोदय, शैक्षणिक गुणवत्ता वाढीचा प्रयत्न स्वागतार्ह्य आहे. माझी अशी विनंती आहे की, बरीचशी डी.एड. झालेली मुले बेकार आहेत. डी.एड. झालेल्या मुलांची बॅच ठेवून त्यांना मुलांना शिक्षण देण्यास सांगून अप्रगत मुलांना प्रगत मुलांबरोबर आणता येईल काय ? माननीय मंत्री महोदय अशा प्रकारची योजना राबविणार आहेत काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, डी.एड. झालेल्या मुलांचा विचार करण्यास हरकत नाही.

-----------

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.173849**

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास एक महत्वाची गोष्ट आणावयाची आहे. सरकारची आणि मंत्रालयामध्ये बसलेल्या अधिका-यांची मन:स्थिती ......

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रत्येक वेळी प्रश्न डेव्हलप करु नये. मी आपल्याला सांगू इच्छितो की, काल या प्रश्नासंदर्भात आपण बोललात ते वगळून जर आपल्याला काही बोलावयाचे असेल तर आपण बोला. सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाबाबत एक-दोन महत्वाचे प्रश्न विचारावेत.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मराठवाडयाबाबतीत हा प्रश्न विचारुन आज 45 दिवस झालेले आहेत. दिनांक 23 मे रोजी दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये शेतक-यांच्या वाढत्या आत्महत्यांबाबत अग्रलेख आला होता. 265 आत्महत्या केलेल्या शेतक-यांपैकी 152 शेतकरी शासकीय मदतीस अपात्र आहेत.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 13:50

श्री. श्रीकांत जोशी (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 17349...

विशेषत: बीड जिल्ह्यात 85 पैकी 79 शेतकऱ्यांना मदत देण्यास अपात्र ठरविलेले आहे. श्री.संतोष सयाजी हिरेकर हा 24 वर्षाचा एक तरूण शेतकरी परिस्थितीने गांजल्याने दारू पिऊन आत्महत्या करतो हे कशाचे लक्षण आहे ? सभापती महोदय, आम्ही 45 दिवस अगोदर प्रश्न विचारल्यानंतरही त्याला उत्तर देताना सांगण्यात येते की, चौकशी साठी प्रलंबित असलेली 65 प्रकरणे तातडीने निकालात काढण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. सभापती महोदय, बीड जिल्हयातील 85 पैकी 79 प्रकरणे जी आपण अपात्र ठरविली आहेत त्यांची फेरतपासणी करण्याचे आदेश आजच्या आज आपण देणार काय ? तसेच ही जी 65 प्रकरणे चौकशीची आहेत त्यांची आज सद्य:स्थिती काय आहे ? ही प्रकरणे केव्हापर्यंत निकालात काढली जाणार आहेत ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या एकंदर 152 प्रकरणांमध्ये त्यांना मदत नाकारलेली आहे आणि 65 प्रकरणामध्ये अद्याप निर्णय प्रतिक्षेत आहे. 152 इतक्या मोठ्या संख्येने मदत नाकरली आहे म्हणून आपण चिंता व्यक्त केली आहे. सभापती महोदय, ज्या 152 प्रकरणांमध्ये मदत नाकारली आहे त्यांची प्रकरणे पुन्हा तपासण्यासाठी जी समिती तयार केलेली आहे त्या समितीमध्ये शेतकऱ्यांचे प्रतिनिधी अधिक एनजीओंचे प्रतिनिधींचा समावेश करून ही प्रकरणे पुन्हा तपासली जातील. तसेच 65 प्रकरणांपैकी 40 प्रकरणांमध्ये निर्णय झालेले आहेत आणि उरलेली 25 प्रकरणे लौकरच निकालात काढण्यात येतील. सभापती महोदय, बीड जिल्हयात जी एकंदर 78 प्रकरणे अपात्र आहेत त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, 2006 मध्ये एकूण प्रकरणे 61 आहेत त्यातील अपात्र 56 आहेत आणि त्यामध्ये ज्यांचेकडे शेती नाही अशी 25 आणि कर्ज नाही अशी 51 प्रकरणे आहेत. म्हणून ज्यांच्या अंगावर कर्ज नाही आणि ज्यांचे नावावावर शेती नाही अशा व्यक्तीला, शेतकऱ्याला आपण मदत देत नाही म्हणून त्यांची प्रकरणे नाकारली गेली आहेत. सभापती महोदय, बीड जिल्हयात 2001 पासून आत्महत्या केलेल्यांची संख्या व तद्अनुषंगिक सर्व माहिती माझ्याकडे आताही उपलब्ध आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या संबंधात सांगितले आहे की, या सर्वांशी बोलल्यानंतर त्या सगळ्यांनीच सांगितले आहे की, खाजगी सावकारांचे कर्ज त्यांच्या अंगावर आहे. त्यामुळेच त्यांची प्रकरणे नाकारली गेली आहेत. तेव्हा

...... के 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 17349...

आपण त्या निकषाबाबत पुनर्विचार केल्यास, शिथिलता आणलीत तर बीड जिल्ह्यातील या 78 पैकी बहुधा सगळीच प्रकरणे क्वालिफाय होतील. तरी आपण तसे करणार का ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, खाजगी सावकारांकडून कर्ज घेऊन त्या बोजाखाली आलेल्या एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्या केली असेल तर त्याच्या कुटुंबियांना आपण मदत करीत नाही. शासकीय किंवा सहकारी बँकांकडून कर्ज घेतले असेल आणि त्यांनी परतफेडीसाठी तगादा लावला असेल आणि त्यातून आत्महत्या केली गेली असेल तर त्याच्या कुटुंबियांना मदत आपण करतो. खाजगी सावकराकडील कर्जाचा बोजा असेल तर तो आपण मदतीसाठी ग्राह्य धरीत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता नामदार मंत्र्यांनी सांगितले की, खाजगी सावकारांचे कर्ज आपण अशा प्रकरणांमध्ये ग्राह्य धरीत नाही. परंतु माझ्याकडे शासनाने दिलेल्या पॅकेजची कॉपी आहे. त्यामध्ये आपण म्हटले आहे की, राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात शेतकऱ्याची आत्महत्या झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर लगेचच संबंधित उपविभागीय अधिकारी/तहसिलदार, तालुका कृषी अधिकारी तसेच पोलीस ठाणे अधिकारी त्याबाबत चौकशी करतील व जिल्हाधिकारी यांच्याकडे अहवाल सादर करतील. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी, जिल्हास्तरीय संबंधित अधिकारी, सेवाभावी संस्था इत्यादींची समिती गठित करण्यात येईल आणि या समितीने आत्महत्यांच्या कारणांची तपासणी करावी व ज्या प्रकरणी नापिकी, राष्ट्रीयीकृत बँक, सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करू शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे आत्महत्या घडल्या असल्यास, संबंधित शेतकऱ्याच्या वारसांना 1 लाख रूपये पर्यंत मदत देण्यात यावी. सभापती महोदय, मान्यता प्राप्त सावकार आणि खाजगी सावकार कोण याची व्याख्या आपण कशी करणार आहात ? म्हणूनच बीड जिल्ह्यातील श्री.संतोष सयाजी हिरेकर या 24 वर्षे वयाच्या शेतकऱ्याने कर्जाच्या बोजामुळे आत्महत्या केली आहे पण त्याची केस या समितीने नाकारली आहे. त्यात त्यांनी असे सांगितले की, श्री.संतोष सयाजी हिरेकर, वय 24 या शेतकऱ्याच्या आत्महत्या प्रकरणी पोलीस स्टेशन करमाड येथे अमुक अमुक कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. मयत शेतकऱ्याने विनापरवाना व्याजाचा धंदा करणारे आरोपी श्री.किसन सांडू काकडे व श्री. अशोक

...... के 3 ...



KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 13:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर (पुढे चालू...)　　　　　　　　　　　　　　　　　　ता.प्र.क्र. 17349...

काकडे यांच्याकडून 50 हजार रूपये व्याजाने घेतल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्या पैशाची परतफेड तो करू न शकल्याने त्यांनी तगादा लावला तसेच पैसे परत न दिल्यास खून करण्याची, मारण्याची धमकी दिली म्हणून त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. परंतु त्याचे प्रकरण मदतीसाठी नाकरले आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एल 1

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17349...

श्री. पांडुरंग फुंडकर...

माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आपण तयार केलेल्या निकषामध्ये राष्ट्रीयीकृत बँक, सहकारी बँक आणि मान्यताप्राप्त सावकार यांचा समावेश केला. परंतु अवैध सावकारी करुन ज्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या ते आपल्याकडील निकषामध्ये बसत नाहीत. म्हणून माझी अशी मागणी आहे की, आपण या जिल्हयासाठी पॅकेज तयार केले, निकष तयार केले परंतु जे अवैध सावकारी करुन शेतकऱ्यांच्या जमिनींवर त्यांना कर्ज देतात आणि कर्जाची परतफेड केल्यानंतर सुध्दा त्यांच्या जमिनी त्यांना परत करीत नाहीत त्यामुळे त्या शेतकऱ्यांना आत्महत्त्या कराव्या लागतात अशा अवैध सावकारीविरुध्द आपण कायदा करणार काय? या ठिकाणी जे प्रकरण सांगितले आहे त्यामध्ये शेतकऱ्याने त्या सावकाराकडून 50 हजार रुपयांचे कर्ज घेतले. परंतु त्याची परतफेड केली नाही म्हणून त्याला आत्महत्त्या करावी लागली. अशा प्रकरणामधील आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांनाही आपण मदत करणार काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, अवैधरित्या सावकारी करणाऱ्या लोकांविरुध्द कारवाई करण्यासंबंधीचा कायदा आहे. त्यानुसार गेल्या वर्षभरामध्ये 150 लोकांवर कारवाई करण्यात आली आहे व आजही कारवाई सुरु आहे. परंतु आपण खाजगी सावकारांकडील प्रकरणे जर ग्राहय धरावयाची ठरविली तर त्यांच्याकडे कोणतेही कागदोपत्री पुरावे सापडत नाहीत. त्यामध्ये कुणी 50 हजाराचे तर कुणी 5 लाखाचे कर्ज घेतल्याचे सांगितले जाते, परंतु त्याबाबतचा पुरावा सादर केला जात नाही. अशाप्रकारची खाजगी सावकाराकडील प्रकरणे ग्राहय धरता येत नाहीत. ज्या मनिलेंडर्सना लायसन्स दिले आहेत त्यांच्याकडील प्रकरणे आपण ग्राहय धरतो. त्या ठिकाणी मदत करण्याचे शासनाचे धोरण आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी कायदा अस्तित्वात असल्याचे सांगितले आहे. तथापि, तो कायदा अपूरा आहे. अवैधरित्या सावकारी केली जाते ती कागदोपत्री सिध्द होत नाही असे आपण म्हटले. परंतु त्यांच्याकडे चिठ्ठया दिलेल्या असतात. त्यांच्याकडील जमीन अतिशय अल्प दरामध्ये खरेदी केली जाते. अशा प्रकरणामध्ये आपण कारवाई करणार काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17349...

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, योग्य पुरावे प्राप्त झाल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच, अस्तित्वात असलेल्या कायद्यामध्ये जर त्रुटी असतील तर तो तपासून पाहून त्यामध्ये सुधारणा केली जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 18393**

श्री. जितेद्र आव्हाड : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये थोडासा विरोधाभास दिसतो. तेव्हा मंत्रिमहोदयांना उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय?

श्री. गणेश नाईक : नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : पहिल्या प्रश्नाला उत्तर देतांना "अंशत: खरे आहे. तथापि, सदर कामगारांना कामावर घेण्याबाबत माथाडी अधिनियमाच्या तरतुदीनुसार तपासून कार्यवाही करण्यात येत आहे." असे म्हटले आहे. दुसरा प्रश्न असा विचारला आहे की, "असल्यास, अद्यापही त्या कामगारांना कामावर घेण्यात आले नाही हे ही खरे आहे काय?" त्याला "होय" असे उत्तर दिले आहे. तर मग माझा प्रश्न असा आहे की, आपण त्यांना कामावर कधी घेणार आणि तसे आदेश केव्हा निर्गमित करणार? हा प्रश्न मिटविण्यासाठी आपल्याला आलेली निवेदने कायद्याच्या कक्षेमध्ये बसवून त्या कामगारांना कामावर घेण्याचे आदेश निर्गमित करणार काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीमध्ये बर्शेन गॅस भरण्याचे काम चालते. हे काम एक टोळी करीत होती. रायगडमध्ये ते काम नेल्यानंतर तेथील स्थानिक लोकांनी आम्हाला ते काम देण्याची मागणी केली. त्यामुळे त्या लोकांना ते काम मिळाले नाही. आजच्या स्थितीत चेंबूर येथील हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीमध्ये ते काम पुन्हा सुरु होणार आहे. परंतु हे काम करणाऱ्या टोळीतील लोकांनी राजीनामे दिले आहेत. माथाडी कामगार मंडळाच्या नियमाप्रमाणे एकदा कामगाराने राजीनामा दिल्यानंतर पुन्हा त्याची नोकरीकरीता नोंद होत नाही. त्या संदर्भामध्ये त्यांनी बैठक घेतल्यानंतर जे प्रकल्पग्रस्त, अल्पभूधारक आहेत अशा घटकातील लोकांनी स्वारस्य दाखवून पुन्हा नाव नोंदविण्याची विनंती केली तर नियमाचा अपवाद करुन त्या लोकांचे नाव नोंदवून त्यांना काम दिले जावे काय? यासंबंधीची बाब तपासून पाहिली जात आहे. ती बाब तपासून झाल्यानंतर त्यांना कामावर रुजू करण्याची कारवाई पूर्ण होईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक 17386</u>**

(श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न सांगली जिल्ह्याचा विचारलेला होता आणि उत्तर मात्र सर्व राज्याच्या संबंधात दिलेले आहे. सांगली जिल्ह्यामध्ये निवासी उप जिल्हाधिकारी श्री.रामचंद्र शिंदे यांच्या नेतृत्वाखाली 64 कर्मचाऱ्यांनी जिल्ह्यातील 249 ग्रंथालयावर छापे टाकले. अंदाजित 2 कोटी रुपयापर्यन्त दर वर्षाला या ग्रंथालयांना अनुदान दिले जाते. काही ग्रंथालयांमध्ये कागदपत्रे व्यवस्थित आहेत, काही ग्रंथालयामध्ये ती मिळत नाहीत. काही ग्रंथालयामध्ये पुस्तके नाहीत, असे असताना अनुदान लाटण्याचे प्रमाण सांगली जिल्ह्यामध्ये वाढलेले होते. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, 249 ग्रंथालयांवर छापे टाकले, त्यामध्ये काय आढळून आले, किती ग्रंथालये बोगस आढळून आली ? बोगस ग्रंथालयांना अनुदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ग्रंथालयांवर छापे घातल्याचे सांगितले. परंतु सांगली जिल्हयातील ग्रंथालयामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी छापे घातले असे नव्हे तर शासनाने दिनांक 27-02-2006 रोजी सर्व कलेक्टरना या संबंधात सूचना दिल्या होत्या. जिल्हावार ग्रंथालयांची यादी पाठवून आदेश दिले होते की, या ग्रंथालयांचे इन्पेक्शन करुन शासनाला रिपोर्ट द्यावा. त्या सूचनेप्रमाणे सांगली जिल्ह्यातील कलेक्टरनी त्यांच्या संपूर्ण जिल्ह्यातील ग्रंथालयांचे इन्स्पेक्शन केले. त्यांचा अहवाल आता आमच्याकडे आलेला आहे. मी या सबंबधाने थोडक्यात सांगू इच्छितो की, त्या ठिकाणची 52 ग्रंथालये बंद असल्याचे आढळून आले. आता सर्व जिल्ह्यांचा याबाबतचा रिपोर्ट येतील. या संदर्भात रिटायर्ड जॉईन्ट डायरेक्टर प्रा.बी.एन.लाड यांची समिती नेमलेली आहे. त्यांना दोन महिन्याचा कालावधी दिलेला आहे. जिल्ह्यांचा रिपोर्ट आलेले असतील ते तपासून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबतचा अहवाल द्यावयाचा आहे. त्यांचे काम सुरु आहे.

**सभापती** : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे, तरी देखील विरोधी पक्ष नेत्यांना एखादा प्रश्न विचारावयास मी परवानगी देतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, बोगस ग्रंथालये सांगली जिल्ह्यामध्ये 52 आढळून आली. या ग्रंथालयांना कोणी मंजुरी दिलेली होती ? बोगस ग्रंथालये दाखवून शासनाकडून अनुदान प्राप्त करुन घेतले असेल तर त्यांची मान्यता रद्द करुन, त्यांच्याकडून अनुदान वसूल करण्यात येणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17386 (पुढे सुरु...

श्री.सुरेश शेट्टी : मी सांगितले की,प्राध्यापक श्री.लाड यांच्याकडून त्या अहवालाची दोन महिन्यात चौकशी करण्यास सांगितलेले आहे. त्यांची चौकशी पूर्ण झाल्यानंतर कारवाई केली जाईल. त्या ग्रंथालयांना जे अनुदान दिलेले आहे, ते अनुदानही रिकव्हरी करण्याची कारवाई केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : अशा बोगस ग्रंथालयांना ज्या अधिकाऱ्यांनी अनुदान दिलेले आहे त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ?

श्री.सुरेश शेट्टी : त्या सर्वांवर कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : आता प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 7- मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

डॉ. सुनील देशमुख ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 6- महाराष्ट्र करविषयक कायदे ( कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2006 चा अध्यादेश क्रमांक 5- महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था ( अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण ) अध्यादेश, 2006 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**पृ.शी./मु.शी.**: सन 2006-07 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

डॉ. सुनील देशमुख ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006-07 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे, आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल सन 2006-07 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस करीत आहे.

**सभापती** : सन 2006-07 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे. सदरहू खर्चाच्या पूरक विवरणपत्राच्या प्रती सन्माननीय सदस्यांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपाल खणामध्ये ठेवण्यात येत आहेत.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती व अधिसंमती.

**सभापती** : विधान परिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहाव्दारे पारित केलेल्या विधेयकांना राज्यपाल व राष्ट्रपती यांची अधिसंमती मिळाल्याची यादी सचिव वाचून दाखवतील.

सचिव : (अ) खालील विधेयके विधानसभेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केली :-

(1) सन 2003 चे वि.प.वि. क्रमांक 15 - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध विधेयक, 2003

(2) सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 11 - महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम ( पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) ( सुधारणा ) विधेयक, 2006

(3) सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 15 - महाराष्ट्र सहकारी संस्था ( सुधारणा ) विधेयक, 2006.

(ब) खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली.

सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 41 - कंत्राटी कामगार सेवा ( विनियमन व उच्चाटन ) ( महाराष्ट्र सुधारणा ) विधेयक, 2005

(क) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली.

(1) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 12 - महाराष्ट्र शेतजमीन ( जमीनधारणेची कमाल मर्यादा ) ( सुधारणा ) विधेयक, 2006

(2) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 13 - महाराष्ट्र महानगरपालिका ( सुधारणा ) विधेयक, 2006

(3) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 14 - महाराष्ट्र अविघटनशील कचरा ( नियंत्रण ) विधेयक, 2006.

(4) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 17 - मुंबई मोटार वाहन कर ( सुधारणा ) विधेयक, 2006

(5) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 18 - महाराष्ट्र ( पुरवणी ) विनियोजन विधेयक, 2006

...4...

RDB/ SBT/ MHM/

सचिव ....

(6) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 28 - उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे विधेयक, 2006

(7) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 30 - महाराष्ट्र विनियोजन ( लेखानुदान ) विधेयक, 2006

(8) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 43 - मुंबई मुद्रांक ( सुधारणा ) विधेयक, 2006

(9) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 50 - महाराष्ट्र मोटार वाहन कर ( दुसरी सुधारणा ) विधेयक, 2006.

(10) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 51 - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन ( सुधारणा ) विधेयक, 2006

(11) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 52 - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, 2006

(12) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 53 - महाराष्ट्र मुंबई करमणूक शुल्क ( सुधारणा ) विधेयक, 2006

(13) सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 54 - महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्यांवरील कर ( सुधारणा ) विधेयक, 2006

(14) सन 2003 चे वि.प.वि. क्रमांक 15 - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध विधेयक, 2003

(15) सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 11 - महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम ( पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी ) (सुधारणा) विधेयक, 2006

(16) सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 15 - महाराष्ट्र सहकारी संस्था ( सुधारणा ) विधेयक, 2006

-----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**पृ.शी./मु.शी.**: नियम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. रामनाथ मोते ( समिती सदस्य ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम समितीचा अहवाल सभागृहास सादर करतो.

**सभापती** : नियम समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे. मी असे सांगू इच्छितो की, महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 219 (1) च्या अनुषंगाने ज्या सन्माननीय सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी अहवाल सभागृहास सादर करण्यात आल्याच्या तारखेपासून 10 दिवसांच्या आत सुचवाव्यात.

----

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब व श्री. विलास अवचट यांनी "दिनांक 30 जून, 2006 रोजी भाईंदर पूर्व येथील न्यू गोल्डन नेस्ट परिसरात सोनल आकाश ही चार मजली इमारत व त्या लगतच्या अमरप्रेम या इमारतीचाही काही भाग कोसळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "राज्यात सार्वजनिक स्थळे व मंदिरे अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर असल्यामुळे दिनांक 7 जुलै, 2006 रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथील यात्रेच्या वेळी लाखो भाविकांचे व विठ्ठल मंदिराचे संरक्षण करण्यासाठी करावयाची उपाययोजना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर सन्माननीय सदस्य यांनी "रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे परशुराम येथील औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये स्फोट होऊन कामगारांचे मृत्यू होणे व आर्थिक नुकसान होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी "यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली, पाचवी व नववीचा अभ्यासक्रम बदलला असून सर्व माध्यमाच्या सर्व विषयांची नवीन पुस्तके शाळा सुरु होऊनही उपलब्ध न होण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी "दिनांक 30 जून, 2006 पासून रायगड जिल्ह्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे सावित्री, गांधारी नद्यांना आलेल्या पुरामुळे महाड, पोलादपूर शहरातील नागरिकांचे जनजीवन धोक्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती पुढे सुरु..

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून अनेक भूखंडावर सुरु असलेल्या घरबांधणी योजनांमध्ये बिल्डर, स्थानिक पुढारी आणि गुंड टोळया यांचा अनेक ठिकाणी संघर्ष सुरु असूनही राज्य शासनाने अद्याप उपाययोजना न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "अनुकंपा तत्वावर नेमणुका मिळण्यासाठी व शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर कायमचा तोडगा काढण्याबाबत दिनांक 3 जुलै 2006 रोजी शेकडो युवकांनी मुंबई येथील आझाद मैदानात उपोषण सुरु करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यावर निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी "दिनांक 20 जून 2006 रोजी मंत्रालयात श्री. किशोर रामभाऊ बोंडे या बेरोजगार युवकाने हाताची नस कापून आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यावर निवेदन करावे. इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 14:10

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे. आपल्या देशामध्ये लोकशाही प्रस्थापित झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेनुसार या देशातील लोकसभा, राज्यसभा तसेच राज्यातील विधानसभा आणि विधान परिषद या चारही सभागृहांचा कारभार चालतो. राज्याच्या विधिमंडळाच्या माध्यमातून राज्याचा कारभार चालत असताना विधानसभेसाठी वेगळे आणि विधानपरिषदेसाठी वेगळे नियम तयार करण्यात आलेले आहेत. या सार्वभौम सभागृहाचे काम नियमानुसार चालत असते. या सार्वभौम सभागृहाचे आपण सभापती आहात. या विधिमंडळाच्या परिसरामध्ये आपण जो निर्णय घेता तो अंतिम असतो. असे असताना आपल्या अधिपत्याखाली असलेल्या दोन्ही सभागृहाचे कामकाज ज्या नियमाने चालते त्या नियमाने आपण न्याय देण्याचा प्रयत्न करीत असता. या सभागृहामध्ये किंवा खालच्या सभागृहामध्ये सर्वसामान्य माणसावर होणा-या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडली जाते. या ठिकाणी विविध प्रश्न मांडले जात असताना सन्माननीय सदस्यांच्या हक्कावर गदा येणार नाही यादृष्टीने आपण त्यांना संरक्षण देता. परंतु काल आपणास जे एक पत्र आलेले आहे त्याची प्रत मला देखील मिळालेली आहे. खालच्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य राणा दिलीपकुमार सानंदा यांनी आपणास पत्र लिहिले आहे. ते पत्र मी आपणास वाचून दाखवितो.

"<u>महत्वाचे/व्यक्तिगत लक्ष्यवेध</u>

मा.ना.श्री. शिवाजीराव देशमुख,<br>
सभापती,<br>
महाराष्ट्र विधान परिषद.

विषय : अवैध सावकारीच्या संदर्भात खोटे आरोप करुन सांसदीय आयुधांच्या माध्यमातून माझे राजकीय विरोधकांद्वारा राजकीय द्वेषापोटी सभागृहात चर्चा उपस्थित करुन माझी व माझ्या परिवाराची बदनामी करण्याचा प्रयत्न झाल्यास 1) सांसदीय आयुधांचा होणारा संभाव्य दुरुपयोग टाळण्यासाठी व विधानसभेचा एक घटक असणा-या एका सदस्याविरुध्द माझे राजकीय विरोधक राजकीय द्वेषापोटी खोट्या कारणांवर आधारित चर्चा करुन माझी व काँग्रेस पक्षाची बदनामी करण्याची शक्यता टाळण्यासाठी 2) दै. देशोन्नती वृत्तपत्राविरुध्द मी 1 कोटी रुपयाचा अब्रू नुकसानीचा दावा वि. फोर्थ सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन नागपूर यांचे कोर्टामध्ये दाखल

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

केलेला असल्यामुळे, 3) सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत माझी सामाजिक प्रतिमा मलीन होईल अशा त-हेचे कोणत्याही प्रकारचे लिखाण देशोन्नतीचे प्रबंध संपादक, इतर स्टाफ मेंबर्स, नोकर, प्रकाशक व त्यांचे इतर हितसंबंधियांनी प्रकाशित करु नये असा मनाई हुकूम वि. कोर्टाने दिनांक 26 जून 2006 रोजी पारीत केला असल्यामुळे 4) तसेच तक्रारीशी संबंधित प्रकरणे उच्च न्यायालयात प्रविष्ट असल्यामुळे 5) त्याचप्रमाणे सभागृहाचा बहुमूल्य वेळ व्यर्थ जाऊ नये म्हणून अशा प्रकारच्या चर्चा सभागृहात घडविण्याची अनुमती म.वि.प. नियम 35 अन्वये नाकारणे बाबत"

...नंतर श्री. भोगले...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 14:15

श्री.पांडुरंग फुंडकर.........

सभापती महोदय, हे आपल्याला सुचवितात की, अशा प्रकारची चर्चा या सभागृहात करु नये. परंतु तरी देखील परिषद सभागृहात चर्चा होऊन माझी बदनामी झाल्यास त्याबद्दलची जबाबदारी स्वीकारुन मी करणार असलेल्या कायदेशीर कारवाईला सामोरे जाण्याची समज संबंधितांना देण्यात यावी. सभापती महोदय, याचा अर्थ असा की, जर तुम्ही आम्हाला या सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यास, संबंधित आमदार किंवा त्यांच्या परिवाराविषयी प्रश्न उपस्थित करण्यास संमती दिली तर तुम्हाला कोर्टात खेचले जाईल आणि आम्ही प्रश्न उपस्थित केला म्हणून आम्हाला देखील कोर्टात खेचले जाईल अशा प्रकारचे धमकीवजा पत्र या सभागृहाच्या सभापतींना देण्यात येत असेल आणि त्याची प्रत खालच्या सभागृहातील आणि या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांना देण्यात येत असेल आणि अशा पध्दतीने अन्याय, अत्याचाराला, अवैध सावकारीला वाचा फोडण्याचा सभागृहाच्या माध्यमातून प्रयत्न झाल्यास अशा प्रकारची धमकी दिली जात असेल तर आपल्याही अधिकारावर गदा आणण्याचा हा प्रयत्न आहे. हा प्रश्न आम्ही उपस्थित करणार असलो तरी आपल्या आसनाला अशा पध्दतीने कोणी चॅलेंज देणार असेल तर त्याबाबत आपण काय कारवाई करणार, समज देणार हे स्पष्ट झाले पाहिजे. अन्यथा आम्हाला प्रश्न मांडायला याठिकाणी बंधन येणार आहे. आम्ही प्रश्न मांडला म्हणून आणि तुम्ही प्रश्न उपस्थित करण्यास संमती दिली म्हणून कोणी आम्हाला कोर्टात खेचण्याची धमकी देणार असेल तर ते योग्य नाही. म्हणून सभापती महोदय, मी औचित्याचा मुद्दा मांडला आहे, या पत्राची गंभीर दखल घ्यावी अशा प्रकारची विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अशा प्रकारची धमकी विधिमंडळाच्या माध्यमातून जे विद्यमान आमदार विधानसभेचे सदस्य आहेत त्यांच्या संदर्भात आपल्या माध्यमातून खुलासा करु इच्छितो. ही घटना अत्यंत गंभीर आहे. या संदर्भातील संपूर्ण फाईल माझ्याकडे उपलब्ध आहे, त्यातील मजकूर वाचण्यास पुरेसा वेळ नाही. मी आपल्या माध्यमातून पुन्हा आवाहन करतो, आम्हाला धमकी देण्यापेक्षा टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये farmer to labourer अशी बातमी आज प्रसिध्द झाली आहे. गरीब कुटुंबातील शेतकऱ्यांना सावकारीमधून लुबाडल्यानंतर तो किती उद्ध्वस्त होतो ही ती बातमी आहे. माननीय आमदारांच्या बंगल्याचे चित्र देखील छापले आहे. त्यांना आपल्या माध्यमातून आवाहन आहे, आजच्या टाईम्स ऑफ इंडियाने त्यांचा पर्दाफाश

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

केला, त्यांना कोर्टात खेचावे म्हणजे काय होते ते कळेल. अशा प्रकारची धमकी देणे कितपत योग्य आहे या संदर्भात आपण निर्णय द्यावा. आपल्या निर्णयामध्ये आमदारांच्या संदर्भात योग्य ती समज देण्याबद्दलचे पत्र विधानसभेच्या माननीय अध्यक्षांना पाठवून त्यांना समज देण्याची व्यवस्था करावी.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे जो प्रश्न याठिकाणी उपस्थित केला, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.सानंदा हे या सभागृहाचे सदस्य नाहीत, त्यामुळे खालच्या सभागृहाच्या सदस्यांनी माननीय सभापतींना पत्र लिहून त्यांच्या संदर्भात अन्य ठिकाणी काय कारवाया झालेल्या आहेत किंवा त्यांची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न काही लोकप्रतिनिधी करतात हे कोणाला उद्देशून लिहिले त्याची आम्हाला माहिती मिळाली नाही. म्हणून पहिल्या प्रथम प्रोप्रायटीचा प्रश्न आहे. विधानसभेच्या सदस्यांना माननीय सभापतींना अशा प्रकारचे पत्र लिहिण्याचा अधिकार नाही. हायकोर्टामध्ये आणि जिल्हा कोर्टामध्ये काय चालले आहे त्या संदर्भात माहिती देऊन या सभागृहातील सदस्यांना धमकावण्याचा प्रश्न त्यांच्या पत्राच्या माध्यमातून उपस्थित झाला तो पूर्णपणे चुकीचा आहे, बेकायदेशीर आहे. त्यांचा तो अधिकार नाही. त्यामुळे आपल्या माध्यमातून सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न उपस्थित केला, विधानसभेच्या माननीय अध्यक्षांना पत्र लिहून अशा प्रकारचे वर्तन जे त्यांच्या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी केले ते पूर्णपणे बेकायदेशीर आहे, कोणत्याही कायद्याचा आधार नाही, ते कृत्य निंदनीय आहे हे आपल्या माध्यमातून त्यांना कळवावे एवढीच या निमित्ताने मी विनंती करतो.

(नंतर श्री. जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय विरोधीपक्ष नेते फुंडकर साहेबांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. खरे म्हणजे नियम 35 अनुसार या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु या सदनाचा जो सदस्य असतो त्यालाच नियम 35 उपस्थित करता येतो. सभापती महोदय, तसेच त्यांनी पत्र पाठवून धमकी देणे तसेच त्याच्या प्रती इतर सन्माननीय सदस्यांना वितरीत करणे हे भयानक आहे त्यामुळे या प्रश्नाची आपण गंभिरतेने दखल घेऊन त्याबाबत निर्णय घेऊन त्यासंदर्भातील माहिती माननीय विधानसभा अध्यक्षांना द्यावी व संबंधित सदस्यांविरुध्द हक्कभंग देण्याच्या संदर्भात मार्गदर्शन करावे. या सन्माननीय सदस्यांच्या विरुध्द 44-45 केसेस दाखल झालेल्या असून त्यांना अटक करण्यासाठी वॉरंट सुध्दा काढण्यात आलेले आहे. परंतु खरे म्हणजे या सदस्यांना सरकारच संरक्षण देत आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी आपल्याला पत्र देऊन नियम 35 चा दुरुपयोग केलेला आहे त्यामुळे संबंधित सदस्यांना कडक समज देण्यात यावी एवढाच माझा औचित्याच्या माध्यमातून मुद्दा होता.

श्री. जयंत प्र. पाटील : सन्माननीय विरोधीपक्ष नेत्यांनी जो औचित्यांचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. ज्या सदस्यांनी आपल्याला पत्र दिलेले आहे त्यांच्या विरुध्द आपण काही तरी निर्णय घेतला पाहिजे. आमच्यासारख्या नवीन सदस्यांना कळले पाहिजे की, हायकोर्ट किंवा कोणतेही कोर्ट या सभागृहाला बंधन घालू शकते काय? माझ्या ज्ञानाप्रमाणे हायकोर्ट किंवा जिल्हा कोर्टाला कायद्यानुसार आपल्या सभागृहाला बंधन घालण्याचे अधिकार दिलेले नाहीत. हे सभागृह सार्वभौम आहे. त्यामुळे असे पत्र देणारा आमदार असो, कोणतीही व्यक्ती असो किंवा सर्वसामान्य माणूस असो त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे. या सभागृहाचा अवमान होईल असे कृत्य कोणी करीत असेल तर त्यावर गंभीर कारवाई करुन संबंधिताविरुध्द हक्कभंग दाखल करावा एवढाच माझा औचित्याच्या माध्यमातून मुद्दा होता.

**माननीय सभापती** : विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे तो अत्यंत गंभीर आहे. या सदनातील असणारे सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या विशेष हक्काचे संरक्षण होणे या अनुषंगाने काही प्रथा,परंपरा तसेच काही नियम सुध्दा आहेत. या अनुषंगाने सार्वभौम सभागृहात ज्या पध्दतीने काम चालते त्यामध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सभासदांवर कोणत्याही पध्दतीचे दडपण येणार नाही याची काळजी आपण सातत्याने घेत असतो. या विषयाच्या संदर्भात

....2

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती**.......

संबंधितांनी मला तसेच सन्माननीय विरोधीपक्ष नेत्यांना व सन्माननीयसदस्य श्री. दिवाकर रावते यांना पत्र पाठविलेले आहे. खरे तर प्रथा, पंरपरा अशी आहे की, जर एखाद्या विधानसभेच्या सदस्यांला एखादी गोष्ट सूचित करावयाची असेल तर विधानसभेच्या अध्यक्षांच्या माध्यमातून ही गोष्ट निदर्शनास आणली जाते. अशा वेळी विधानसभेचे अध्यक्ष विधान परिषदेच्या सभापतींच्या ही गोष्ट निदर्शनास आणून देतात अशी प्रथा आहे. असे असतांना सगळया मर्यादेचे उल्लंघन एखादी व्यक्ती करीत असेल तर हक्कभंगाच्या दृष्टीने कारवाई करणे जरुरीचे आहे. त्यामुळे यासंदर्भात कायदेशीर सल्ला माझ्या विभागाकडून घेण्यात येईल. खरे म्हणजे म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावता कामा नये. त्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात आपण गंभीर असण्याची आवश्यकता आहे. या मुद्याच्या संदर्भात सन्माननीय विरोधीपक्ष नेत्यांच्या मनाला जो क्लेश झाला याबाबतीत मी सन्माननीय विधानसभा अध्यक्षांना आपल्या ज्या भावना आहेत, सभागृहाच्या ज्या भावना आहेत त्या कळवितो. तसेच यांसदर्भातील माझा अभिप्रायही खालच्या सभागृहाला कळवितो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती........

मी विधानमंडळाच्या सचिवांना सांगू इच्छितो की, त्यांनी या प्रकरणी हक्कभंग होतो किंवा कसे याबाबत मार्गदर्शन करावे. उद्या मी या संदर्भातील निर्णय सभागृहात घोषित करीन.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एका गंभीर औचित्याचा मुद्दा मी आपल्या माध्यमातून उपस्थित करीत आहे.आम्ही या सदनामध्ये बसलो आहोत, येथे कोणत्या प्रतिष्ठेने बसावे अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे, यासंबंधी माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आपणा सर्वांना माहीत आहे की, गेल्या महिन्यात संभाजीनगर येथे मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा आणि आरडीएक्सचा साठा पकडण्यात आला. यामध्ये काही लोक गुंतले असल्याचे वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले होते. "महाराष्ट्रापुढे दहशतवादाचे आव्हान" अशाप्रकारचे वर्णन वर्तमानपत्रात आले होते. मालेगाव येथे इंडिका कारसह सिमीच्या अतिरेक्यांना पकडण्यात आले. सभापती महोदय, माझ्याकडे दैनिक महाराष्ट्र टाईम्समध्ये आलेली बातमी आहे. ती बातमी अशी आहे की, "स्फोटके बाळगणारे दोन अतिरेकी आकाशवाणी आमदार निवासातील खोल्यांमध्ये गेले होते" हे अतिरेकी कोणत्या पक्षाच्या आमदारांच्या खोलीमध्ये फ्रेश होण्यासाठी गेले होते याची पोलीस सावधतेने तपासणी करीत आहेत. विधानपरिषद सदस्या श्रीमती फौजिया खान, दुसरे विधानपरिषद सदस्य श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी आणि विधानसभा सदस्य श्री.रशिद शेख या तिघांच्या खोलीत ते अतिरेकी गेले होते का, याचा तपास पोलीस करीत आहेत. ही बातमी महाराष्ट्रभर आणि देशभर गेली आहे. दहशतवाद्यांना आमदारांचे सहाय्य मिळत असेल तर ही अतिशय गंभीर बाब आहे. याबाबतीत कोणताच खुलासा करण्यात आलेला नाही. एक विधानसभा सदस्य आणि दोन विधानपरिषदेच्या सदस्यांची नावे यामध्ये आलेली आहेत. हे राष्ट्रद्रोही आमदार सदनात बसत असतील तर या संबंधी तपास झाला पाहिजे. एका चॅनलच्या माध्यमातून ही बातमी आलेली आहे. या संदर्भात राज्याच्या गृहमंत्र्यांनी देखील खुलासा केलेला नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. तेव्हा या विषयाबाबत गांभीर्याने विचार व्हावा. आमच्या सहकाऱ्यांवर मला शिंतोंडे उडवावयाचे नाहीत जर ते दोषी नसतील तर ती चांगलीच गोष्ट आहे. परंतु जर ते राष्ट्रद्रोही कारवायामध्ये गुंतले असतील तर तो गुन्हा असून ते आपल्याला भूषणावह नाही. आपण कोणत्या पक्षाचे आहोत यापेक्षा प्रथम आपण भारतीय नागरिक आहोत. आमच्या सहकाऱ्यांवर मला शिंतोडे उडवावयाचे नाहीत परंतु ही बाब गंभीर आहे. आपले गृहमंत्री या विषयावर मूग गिळून का बसले आहेत ? त्यांच्यावर कुणाचा दबाव आणण्याचा प्रयत्न होत आहे का ? हे या सदनाच्या माध्यमातून आम्हाला आणि जनतेला कळावयास पाहिजे.एवढी माझी आपणास विनंती आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे जो विषय उपस्थित केला, त्यास माझी हरकत आहे. कुठल्या तरी वर्तमानपत्रामध्ये बातमी आली आणि त्या बातमीच्या आधारे सभागृहामध्ये चर्चा घडवून आणणे व ते विषय औचित्याच्या मुद्याद्वारे उपिस्थत करणे, हा चुकीचा पायंडा आहे. औचित्याच्या मुद्याऐवजी दुसऱ्या कोणत्या आयुधाचा वापर त्यांनी केला असता तर मी समजू शकलो असतो. त्यामुळे त्यांनी याठिकाणी जे म्हणणे मांडले त्यास माझी हरकत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय विधान परिषद सदस्या श्रीमती फौजिया खान यांच्या संदर्भात त्यांनी वक्तव्ये केले. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी राष्ट्रवादी पार्टीकडे पत्र दिलेले आहे. अशाप्रकारे....

(शिवसेना पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : आपण बोलत होता, त्यावेळी मी हस्तक्षेप केला नाही. त्यामुळे माझ ो म्हणणे आपण ऐकून घ्यावे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी राष्ट्रवादी पार्टीकडे पत्र देऊन कळवले आहे की, "वर्तमानपत्राच्या बातमीमध्ये जो उल्लेख करण्यात आलेला आहे तो निराधार असून चुकीचा आहे." त्यांनी असेही म्हटले आहे की, त्यांच्या आमदारनिवासातील रुमचा कुठल्याही प्रकारे गैरवापर झालेला नाही. अशा प्रकारे त्यांनी रायटींगमध्ये पक्षाकडे पत्र दिलेले आहे. वास्तविक पाहता, त्या स्वत:च पत्रक काढून याबाबत खुलासा करणार होत्या, परंतु मीच त्यांना खुलासा करु नये असे सांगितले. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडला त्यास माझा आक्षेप आहे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मैं इस सदन में नया सदस्य हूं. माननीय सदस्य श्री. रावते साहब ने अभी यहां जो मुद्दा उपस्थित किया है, मैं उसके बारे में यह कहना चाहूंगा कि आज से पहले भी मैं आमदार निवास में जाता था, मुझे मालूम है कि वहां कई लोग आते हैं. माननीय सदस्य श्री रावते जी ने यहां तीन सदस्यों का नाम लिया है, ये तीनों सदस्य विशिष्ट समाज से संबंधित हैं.

(शिवसेना पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी हे जागेवर उभे राहून जोरात बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : कृपया सन्माननीय सदस्य श्री.जव्हेरी यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी आपला हरकतीचा मुद्दा मांडावा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय,....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आता कोण सन्माननीय सदस्य बोलले ? त्यांचा परिचय काय ? सन्माननीय सदस्यांची ओळख होण्याची आवश्यकता आहे.

**सभापती** : श्री.जैनुद्दीन मोहसीन भाई जव्हेरी असे सन्माननीय सदस्यांचे नांव असून त्यांनी माझ्या दालनात शपथ घेतलेली आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा या ठिकाणी मांडला व त्यानंतर सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी त्याबाबत खुलासा केला आहे. मला अतिशय दु:ख वाटते की, सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना 'औचित्य' या शब्दाचा अर्थच कळला नाही. या सभागृहातील सन्माननीय सदस्य कोणत्या पक्षाचे आहेत हे महत्वाचे नसून ते या सभागृहाचे सदस्य असल्याने एखाद्या सदस्यामुळे जर या सभागृहाची अप्रतिष्ठा होत असेल तर ते महत्वाचे आहे. या सभागृहातील सन्माननीय सदस्याचे नाव एका वर्तमानपत्रात छापून येते आणि तेही राष्ट्रद्रोही कारवायासंदर्भात छापून येते तेंव्हा हा विषय औचित्याचा ठरतो आणि तसा तो सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी उपस्थित केला. कुणाकडे जर खाजगी पत्र आले असेल तर ते महत्वाचे नाही. या सदनामध्ये अशा प्रकारचा औचित्याचा मुद्दा उपस्थित करणे हा आमचा अधिकार आहे. दुर्देवाने आमच्या सदनातील एखादा सदस्य जर अशा देशद्रोही कारवायांमध्ये सामील असेल तर तो या सदनाचा अपमान आहे. सन्माननीय सदस्यांनी वर्तमानपत्रात किंवा मिडियामध्ये याबाबतचा खुलासा केला असता तर सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांना औचित्याच्या मुद्याव्दारे हा विषय या ठिकाणी उपस्थित करण्याची वेळ आली नसती. त्याचप्रमाणे या ठिकाणी एक नवनिर्वाचित सन्माननीय सदस्य, ज्यांचा परिचय या सभागृहात झालेला नाही, ज्यांचे नांव आम्हाला माहित नाही, ते या विषयावर बोलले, केवळ बोलले एवढेच नाही तर त्यांनी या विषयाला वेगळे वळण दिले, जातीचे, धर्माचे वळण दिले. अशा प्रकारे त्यांना राष्ट्रद्रोहयांचा कळवळा येत आहे काय ? त्यामुळे नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांनी जो काही उल्लेख या ठिकाणी केलेला आहे तोही कामकाजातून काढून टाकावा, अशा प्रकारची माझी विनंती आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, एक अत्यंत गंभीर मुद्दा या ठिकाणी उपस्थित झाला आहे. परंतु, या संपूर्ण चर्चेच्या स्वरुपामुळे हे सर्व सन्माननीय सदस्य गुन्हेगार आहेत, अशा प्रकारचे वातावरण बाहेर जात आहे. सन्माननीय सदस्य, श्री.रशिद शेख हे खालच्या म्हणजेच विधानसभेचे सदस्य आहेत. त्यांच्याबद्दल जी घटना घडली ती केवळ मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. मालेगाव येथे 3 अतिरेकी पकडले गेले. त्यांना सोडविण्याकरिता सन्माननीय श्री.निहाल अहमद आले होते. याबाबतीत विरोध करुन अतिरेक्यांना अटक करा हे सांगण्याचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.............

काम सन्माननीय सदस्य, श्री.रशिद शेख यांनी केलेले आहे. कोण हिंदू असेल कोण मुस्लिम, पण जर कुणी राष्ट्रद्रोही कारवायांमध्ये असतील तर त्यांच्याबाबतीत जरुर बोलले पाहिजे. परंतु, ज्या सन्माननीय सदस्यांनी राष्ट्रद्रोही कारवाया करणा-या अतिरेक्यांना अटक करण्याची मागणी केली आहे त्यांच्यासंदर्भात अशा प्रकारे उल्लेख झाला आहे, हे योग्य नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधानसभेचे सन्माननीय सदस्य, श्री.रशिद शेख यांच्या नावाचा उल्लेख झालेला नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या ठिकाणी नवनिर्वाचित सन्माननीय सदस्य बोलले, त्यांचा परिचयही आम्हाला झालेला नाही. एकदम उठून त्यांनी या विषयाला वेगळे वळण दिले हे या सदनाच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे आहे. देशाच्या दृष्टीकोनातून हा विषय अतिशय गंभीर आहे. विषय समजून घेऊन हा मुद्दा का मांडावा लागला यासंदर्भात सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य, श्री.अरविंद सावंत यांनी आपले म्हणणे मांडलेले आहे. औचित्याचा मुद्दा मांडण्याचा अधिकार प्रत्येक सन्माननीय सदस्यांना आहे. देशाचा प्रश्न असेल तर तो प्रत्येकाने गांभीर्याने घेतलाच पाहिजे, त्या ठिकाणी पक्षाचा प्रश्न येत नाही. माझी हरकत ही आहे की, नवनिर्वाचित सन्माननीय सदस्य जे या सदनामध्ये बोलले ते सर्व कामकाजातून काढून टाकावे. प्रथम त्यांचा परिचय या सदनाला करुन द्यावा आणि नंतरच त्यांनी त्यांचे निवेदन करावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे या ठिकाणी ही चर्चा उपस्थित केली आहे. नियम 35 जर आपण पाहिला तर प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कोणत्याही सभासदाच्या बाबतीत एखादी गोष्ट या सदनामध्ये सांगावयाची असेल तर त्याला अगोदर नोटीस देऊ शकलो तर त्या सन्माननीय सदस्याला आपली बाजू या सदनामध्ये मांडणे शक्य होते. हा औचित्याचा मुद्दा मांडण्याच्या अनुषंगाने हे काहीसे राहून गेले असावे, असे मला स्वत:ला वाटते. एक गोष्ट महत्वाची आहे की, या प्रश्नाच्या अनुषंगाने राज्याचा गृह विभाग सखोल चौकशी करीत आहे, अशी माझी माहिती आहे.

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ........ 14:40

**सभापती** .............

अशा पद्धतीची बातमी आल्यानंतर मी स्वत:, विधान सभेचे अध्यक्ष व संबंधित पोलीस अधिकारी यांची आमदार निवास आणि आमदारांच्या सुरक्षिततेसंबंधी दोन वेळा एकत्र बैठक घेतली. आमदारांची सुरक्षितता महत्वाची आहे त्या अनुषंगाने असा प्रकार झालेला आहे किंवा नाही याबाबत गृह विभागाचा निष्कर्ष येणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी एवढेच सांगितले की, विधान परिषदेतील व विधान सभेतील आमदार, ज्या आमदार निवासामध्ये राहतात त्या आमदार निवासामध्ये अशा पद्धतीची एखादी गोष्ट घडली असेल तर ती बरोबर नाही म्हणून त्यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी दोन-तीन सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख आपल्या औचित्याच्या मुद्दयामध्ये केला. त्या सन्माननीय सदस्यांना जर नोटीस गेली असती तर त्यांना सभागृहामध्ये हजर राहणे शक्य झाले असते व त्या सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात आपली बाजू मांडली असती. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.अरविंद सावंत, श्री.मधुकर सरपोतदार यांनी हरकतीचे मुद्दे उपस्थित केले. मला असे वाटते की, राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने, लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चारही आमदार निवासांची सुरक्षा व्यवस्था चांगली राहणे महत्वाचे आहे, अत्यावश्यक आहे. तसेच, अशी एखादी बातमी सुध्दा कोणाला उपलब्ध होता कामा नये याची काळजी आमदार निवासातील रुमच्या माध्यमातून घेणे आवश्यक आहे. मी एवढेच सांगेन की, श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांचा शपथविधी माझ्या दालनामध्ये 22 तारखेला झालेला आहे. खरे म्हणजे आजच संसदीय कार्य मंत्र्यांच्या माध्यमातून त्यांची ओळख व्हावयास पाहिजे होती. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी मालेगावच्या सन्माननीय सदस्यांच्या संदर्भात भूमिका मांडलेली आहे. ती बातमी आपण सर्वांनीच वाचलेली आहे. ही चर्चा मी वाचून घेईन व जे आक्षेपार्ह आहे ते रेकॉर्डवरुन काढून टाकीन. तसेच, जे योग्य आहे ते रेकॉर्डवर राहील. गृह विभागाला माझी अशी सूचना आहे की, याबाबत गृह विभागाने येत्या दोन दिवसामध्ये तातडीने निवेदन करावे, असा मी निर्णय घेतलेला आहे. सन्माननीय सदस्यांना नियम 35 अन्वये नोटीस उपलब्ध झाली असती तर त्याची प्रत माझ्याकडे आली असती. त्या सन्माननीय सदस्यांना नोटीस उपलब्ध झालेली नाही असे दिसते आहे. त्यामुळे ते सन्माननीय सदस्य आज सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. तरी त्या सन्माननीय सदस्यांना यासंदर्भात निवेदन करावयाचे असेल तर मी त्यांना परवानगी देईन. मी पुन्हा एकदा सांगतो की, सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी हे वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ........ 14:40

**सभापती** .............

स्थानिक प्राधिकारी संस्था या मतदारसंघातून निवडून आलेले आहेत. त्यांनी माझ्या दालनामध्ये 22 तारखेला शपथ घेतलेली आहे. त्याच बरोबर सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव हे रायगड-रत्नागिरी-सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्थेचे लोकप्रतिनिधी आहेत. त्यांनी सुध्दा माझ्या दालनामध्ये शपथ घेतलेली आहे.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

आता सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, पनवेल तालुक्यातील करंजाडे गावातील श्री.खिल्लारे या दलित कुटुंबाला करंजाडे गावातील सर्वश्री निलेश गायकवाड, पुंडलिक आंग्रे, रमेश मालुसरे, यशवंत आंग्रे, भरत साबळे, जनार्दन मोरे आदी तीस गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून अपमानास्पद वागणूक दिली जात आहे व त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केला जात आहे. सभापती महोदय, या खिल्लारे कुटुंबाने सहा महिन्यापूर्वी विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त यांचेकडे माझ्यावर हल्ला होणार आहे, या गुंडांपासून माझ्या जीविताला धोका आहे असे अनेक वेळा लेखी कळविले होते आणि भेटूनही सांगितले होते. स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना देखील सांगितले होते परंतु त्याची दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे या खिल्लारे कुटुंबावर प्राणघातक हल्ला 2.7.2996 रोजी केला गेला. त्यातील श्री.अशोक खिल्लारे हे हॉस्पिटलमध्ये मृत्यूशी झुंज देत आहेत. सभापती महोदय, तेथील एक व्यापारी श्री.सिद्धार्थ भाटिया यांनी या गुंडांना श्री.अशोक खिल्लारे कुटुंबावर हल्ला करण्यास प्रवृत्त केले आहे. त्यामुळे शासनाने या प्रकरणी पूर्ण चौकशी करून ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे तक्रार करूनही त्याची दखल घेतली नाही, कारवाई केली नाही त्यांच्यावर कठोर कारवाई करून या खिल्लारे कुटुंबाला ताबडतोब न्याय मिळवून द्यावा अशी विनंती या औचित्याच्या मुद्याद्वारे मी आपल्याकडे करीत आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, श्री.अशोक खिल्लारे आणि श्रीमती सुनिता खिल्लारे या दलित कुटुंबाला त्या विभागातील एक व्यापारी श्री.सिद्धार्थ भाटिया यांनी गावातील सर्वश्री निलेश गायकवाड, पुंडलिक आंग्रे, रमेश मालुसरे, यशवंत आंग्रे, भरत साबळे, जनार्दन मोरे आदी गुंडांना सुपारी देऊन प्रचंड मारहाण केली इतकेच नव्हे तर 2.7.2006 रोजी त्यांचेवर सशस्त्र हल्ला केला. त्यामुळे श्री.अशोक खिल्लारे हे आज हॉस्पिटलमध्ये अत्यंत गंभीर अवस्थेमध्ये भरती झालेले आहेत. सभापती महोदय, या प्रकरणी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिल्यानंतर ॲट्रॉसिटी ॲक्ट खाली गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर देखील पोलिसांनी आरोपींना अटक केली नाही त्यामुळे त्या गुंडांचे मनोधैर्य वाढले आणि त्यांनी अशा प्रकारे या परिवारावर प्राणघातक हल्ला केला. या कुटुंबाला आता आपल्या जीविताच्या भीतीने गाव सोडून जावे लागले आहे. अशा परिस्थितीत

...... व्ही 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ......

दलितांकडे पाहण्याचा हा जो दृष्टीकोन पोलीस खात्याने घेतलेला आहे, गुन्हा दाखल करूनही कारवाई न करणे हे गंभीर आहे. गुन्हा दाखल केल्यानंतरही आरोपींना अटक केली गेली नाही, त्यामध्ये त्यांचा कोणता व्यवहार झाला आहे काय याबाबत गृहखात्याने गंभीर दखल घ्यावी. तसेच या खिल्लारे कुटुंबावर सुपारी देऊन हल्ला करावयास लावणारा व्यापारी श्री.भाटिया यांचेवर देखील कठोर कारवाई करण्याचे निर्देश आपण शासनाला द्यावेत अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

**सभापती** : माननीय गृह मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी गांभीर्याने या प्रकरणाची नोंद घ्यावी, दखल घ्यावी. मागासवर्गीय व्यक्तिंवर होणाऱ्या अन्यायाबद्दल त्यांना न्याय मिळवून देणे आवश्यक आहे.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : ठीक आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे औचित्याचा मुद्दा येथे उपस्थित करतील.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीत हजारो इमारती अनधिकृत ठरवून जमीनदोस्त करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. परिणामी रहिवाशांमध्ये भययुक्त आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. आयुष्यभर केलेल्या कमाईच्या आधारे लोकांनी घेतलेली घरे अनधिकृत ठरविल्याने जनतेमध्ये असंतोषाचा उद्रेक होण्यासारखी स्फोटक परिस्थिती निर्माण झाली आहे. उल्हासनगरप्रमाणे या रहिवाशांच्या घरांना संरक्षण व न्याय देण्याची आवश्यकता आहे. या अत्यंत महत्त्वाच्या सार्वजनिक बाबीविषयी मी, या सार्वभौम सभागृहात, औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे, कृपया याची दखल घ्यावी ही विनंती.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे औचित्याचा मुद्दा उपस्थित करतील.

( यानंतर श्री.सरफरे ....डब्ल्यू 1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, राज्य सरकारने नव्याने खानदेशसाठी स्वतंत्र वैधानिक मंडळ स्थापन करण्याचे ठरविले आहे. आणि त्यासंबंधी कॅबिनेटमध्ये देखील निर्णय झाला असल्याचे समजते. खानदेश म्हटल्यानंतर जळगाव, धुळे व नवीन झालेला नंदूरबार जिल्हा त्यामध्ये अंतर्भूत होत आहे. याला विरोध करण्याकरिता विधानमंडळाचे माननीय सदस्य विधान भवनाच्या प्रवेशव्दारावर उपोषणाला बसले आहेत. याकडे औचित्याच्या मुद्दयाव्दारे मी शासनाचे लक्ष वेधतो की, आपण केवळ या जिल्हयांचा समावेश न करता त्यामध्ये नाशिक जिल्हा देखील अंतर्भूत केला पाहिजे. नाशिक जिल्हयातील कळवण, सटाणा व देवळी हे तालुके संस्कृती व परंपरेने खानदेश जिल्हयातील आहेत. खानदेशातील अहिराणी भाषा प्रत्यक्षात त्या भागामध्ये बोलली जाते. तेव्हा त्या भागाकरिता आपल्याला वैधानिक विकास मंडळ स्थापन करावयाचे असेल तर ते संपूर्ण उत्तर महाराष्ट्रासाठी स्थापन करावे. खानदेश म्हटल्यानंतर तेथील विशिष्ट भाषा गृहीत धरली जाते. म्हणून आपण स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ केवळ खानदेशाकरिता न करता उत्तर महाराष्ट्रासाठी स्थापन करावे. जेणेकरुन त्यामुळे त्या चार जिल्हयांना न्याय मिळेल अशी विनंती करतो. तसेच, यामध्ये लक्ष घालून उपोषणाला बसलेल्या सन्माननीय सदस्यांचे लवकरात लवकर उपोषण सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती करतो.

**सभापती** : माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त, अरविंद सावंत यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्दयांच्या संदर्भातील मुद्दे माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांनी आपल्यामार्फत संबंधित सन्माननीय मंत्रिमहोदयांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करावी. तसेच, त्या विषयी गांभीर्याने लक्ष देण्याबाबत आपण त्यांना विनंती करावी. त्यादृष्टीने आपण नोंद घ्यावी.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: माननीय सभापतींनी सभागृहाच्या कामकाजासंबंधी दिलेला निर्णय

**सभापती** : दिनांक 14 जून 2006 रोजी माझ्या दालनामध्ये विधान परिषद नियम समितीची तसेच विधान परिषदेचे माननीय विरोधी पक्षनेते, माननीय गट नेते व माननीय सदस्य यांची एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीमध्ये सभागृहातील विविध आयुधे व सर्वसाधारण कामकाज याबाबत सखोल चर्चा होऊन काही मुद्दयांच्या अनुषंगाने आम्ही निर्णय घेण्यापर्यंत पोहोचलो आहोत. त्यामध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये दररोज किमान 10 प्रश्नापर्यंत आपण कसे पोहोचू या दृष्टीने प्रयत्न करावयाचा निर्णय झाला आहे. मात्र कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत आपण वेळेचे बंधन घातलेले नाही. परंतु शक्यतोवर 10 ते 12 प्रश्नापर्यंत पोहोचलो तर माननीय सदस्यांच्या प्रश्नांना जास्तीत जास्त आपण न्याय देवू. आज आलेल्या मिठी नदीच्या प्रश्नाला आपण 22 मिनिटांचा वेळ दिला. यासारखा एखादा महत्वाचा प्रश्न असेल तर त्याला जरुर आपण अधिक वेळ देऊ शकतो. अशाप्रकारे दहा ते बारा प्रश्नापर्यंत जाण्याचा आपल्याला प्रयत्न करावयाचा आहे. त्याचबरोबर प्रश्नोत्तराचा तास अत्यंत महत्वाचा असल्यामुळे हरकतीच्या मुद्दयांना प्रश्नोत्तराच्या तासामध्ये परवानगी देऊ नये या निर्णयापर्यंत मी येऊन पोहोचलो आहे.

प्रश्नोत्तरांचा तास संपल्यानंतर औपचारिक शासकीय कामकाज असते. काही वेळेस प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर शासकीय कामकाज प्रलंबित राहते. तेव्हा हे औपचारिक शासकीय कामकाज पूर्ण करण्यासाठी 5 ते 7 मिनिटे लागत असल्यामुळे हे कामकाज प्राधान्याने पूर्ण करण्यासंबंधी त्या बैठकीमध्ये निश्चित असा निर्णय घेतला गेला आहे.

औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्याच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर या सदनामध्ये काही वेळा 15 ते 16 माननीय सदस्यांकडून औचित्याचे मुद्दे देण्यात आले आहेत. म्हणून आपण असा निर्णय घेतला आहे की, विरोधी पक्षाचे दोन माननीय सदस्य, सत्ताधारी पक्षाचे दोन माननीय सदस्य, त्यामध्ये अपक्ष माननीय सदस्यांना कसे सामावून घ्यावे यादृष्टीने मी निर्णय घेईन. अशाप्रकारे एका वेळेस फक्त चार माननीय सदस्यांव्यतिरिक्त अन्य माननीय सदस्यांचे औचित्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

04-07-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) W 3

DGS/ SBT/ MHM/ 14:50

**मा. सभापती**...

मुद्दे सदनामध्ये चर्चेला येणार नाहीत. तसेच, माननीय सदस्यांना औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा असल्यास हे सदन सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर त्यासंबंधीची सूचना माननीय सदस्यांनी माझ्याकडे आणून द्यावी. अशाप्रकारे औचित्याच्या मुद्दयासंबंधी निर्णय घेतला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे.... 14:55

सभापती (पुढे सुरु...

औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, या सदनात जे जेष्ठ मंत्री उपस्थित असतील त्यांनी याबाबत नोंद घ्यावयाची आहे आणि संबंधित विभागाला औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून जे मुद्दे उपस्थित झाले त्यांची माहिती पाठवायची आहे. लक्षवेधी सूचना देखील आयुधांच्यादृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण अशी बाब आहे. पण काही वेळा लक्षवेधी सूचनेवर दोन-अडीच तास चर्चा होण्याची शक्यता असते. म्हणून मी सन्माननीय सदस्यांच्या सहमतीने त्यांच्याबरोबर चर्चा करुन असा निर्णय घेतला की,जसे आपण प्रश्नोत्तराच्या तासाला एक तास वेळ देतो. तसाच लक्षवेधी सूचनेला देखील एक तासाचा वेळ द्यावा. या एक तासामध्ये ज्या काही 3-4 लक्षवेधी सूचना असतील त्या पूर्ण कराव्यात. 45 मिनिटे लक्षवेधी सूचनेस द्यावी आणि 93 च्या सूचनेवरील प्रश्नांकरिता 15 मिनिटांचा वेळ द्यावा असे बैठकीत ठरले, पण मी असा निर्णय घेतला आहे की, लक्षवेधी सूचनेला 1 तासाचा वेळ द्यावा. एक तास संपल्यानतर जसा प्रश्नोत्तराचा तास संपतो त्याप्रमाणे लक्षवेधीच्या बाबतीत एक तास झाल्यानंतर लक्षवेधीवरील चर्चा थांबेल, असा निर्णय घेतलेला आहे. याप्रमाणे एक तासाचा वेळ देण्याचे ठरविले आहे. त्यानंतर 93 च्या सूचना दररोज येतात, त्यांच्याबाबतीत एक-दोन मिनिटामध्ये निर्णय घेतो. आता किमान त्यावरील चर्चेसाठी 13-14 मिनिटे यासाठी उपलब्ध होतील. त्या अनुषंगाने दररोज 6 निवेदने घ्यावयाची ठरविली तर कामकाज व्यवस्थित होईल. सन्माननीय सदस्यांना या निवेदनावर तीन-चार उप प्रश्न विचारण्याची संधी मिळेल. पण हे काम 15 मिनिटामध्ये पूर्ण करावयाचे आहे. त्यानंतर अर्धातास सूचनेच्या अनुषंगाने जी आजची पध्दती आहे, ती पाळत असताना ज्या दिवशी अर्धातास चर्चा कार्यक्रम पत्रिकेवर दाखविली असेल त्याच दिवशी त्यावरील चर्चा पूर्ण होईल,या दृष्टीने आपण निश्चित पध्दतीने निर्णय घेऊ. ती चर्चा पुढे ढकलली जाणार नाही, या दृष्टीने प्रयत्न करु. त्यानंतर विशेष उल्लेखाच्याबाबतीत सन्माननीय सदस्यांची सातत्याने तक्रार होती की, त्यांनी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनेची उत्तरे अनेक वेळा संबंधित मंत्र्यांकडून एक महिन्यामध्ये येत नाहीत. त्याबाबतीत संसदीय कामकाज मंत्र्यांना मी स्वत: बोलावून घेऊन त्यांच्याशी चर्चा करणार आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये एक महिन्याच्या आत उत्तर आलेच पाहिजे, या दृष्टीने कटाक्षाने त्यांना उत्तर द्यायला सांगेन. सत्र कालावधीमध्ये जी शासकीय विधेयके आहेत ती सन्माननीय सदस्यांना लवकर मिळाली तर त्यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने त्यांना उपयुक्त ठरेल, या दृष्टीने ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

सभापती (पुढे सुरु....

विधेयके लवकरात लवकर सन्माननीय सदस्यांच्या हाती कशी पोहोचतील या बाबत मी निर्णय घेतलेला आहे. आपणा सर्वांशी चर्चा करुन हे निर्णय घेतलेले आहेत. आपल्या समोरचे कामकाज अत्यंत काटेकोरपणे केले तर सर्व सन्माननीय सदस्यांना न्याय मिळेल. आपण सगळयांनी मिटिंगमध्ये सहकार्य दिले म्हणून मला हे निर्णय घेणे शक्य झालेले आहे.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, आपण सभागृहाच्या कामकाजाच्या दृष्टीने वेळापत्रक तयार केलेले आहे, त्याबद्दल आभारी आहे. माझी एकच विनंती आहे की, गडबड करण्यासाठी 10-15 मिनिटे ठेवावीत.

**सभापती** : अशी आपल्याकडे दोन-तीन आयुधे आहेत, की ज्यामध्ये आपल्याला याबाबत संधी मिळू शकते.

---

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय नव निर्वाचित आमदार श्री.जव्हेरी यांची भाची मुंबईमध्ये हरवलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एक मुद्दा उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जेव्हेरी यांची भाची मुंबईमध्ये हरवलेली आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नवीन आमदार श्री. जैनुद्दीन जेव्हेरी यांची बहीण शिरपूर, जिल्हा धुळे येथून मुंबईला आलेली आहे. त्यांची भाची काल 3.00 वाजल्यापासून गायब झालेली आहे. मुंबई पोलीस शोध घेत आहेत परंतु त्यांची भाची सापडत नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माझी बहीण शिरपूर, जिल्हा धुळे येथे राहते. दोन तीन दिवसांपूर्वी माझी भाची आणि बहीण भेटीसाठी आली. बहिणीला माहीत नव्हते की, त्यांची मुलगी हरवली आहे. काल 3.00 वाजता आपल्या घरातून भायखळा आणि क्रॉफर्ड मार्केटला त्यांचे दुकान आहे त्या ठिकाणी भेटीसाठी येत होत्या. ती रस्त्यावर 3.00 वाजता हरवली. सायंकाळी 7.00 वाजता याबाबत तक्रार केली. रात्रभर पोलिसांनी काहीही कारवाई केलेली नाही. सभागृहातील माझा आजचा पहिला दिवस आहे. मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी खुलासा केला. फक्त आमदार निवासमध्ये आपल्याला भेटलो. त्या ठिकाणी काय परिस्थिती असते ? माझी भाची मला भेटावयास आली आणि ती हरवली. माझी भाची ही मला मुलगीसमान आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो. त्यांनी मदत केली. त्यांनी फोन केला. पोलीस कारवाई होत नाही. आमदाराच्या बाबतीत असे हाल आहेत. माझे नातेवाईक म्हणतात की, असा आमदार नको...

**सभापती** : माननीय गृह राज्यमंत्र्यांनी सन्माननीय सदस्यांची व्यथा लक्षात घ्यावी. मुंबई पोलिसांकडून आव्हान समजून हा तपास व्हावा आणि त्यांची मुलगी शोधावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सर्व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना देण्यात येतील आणि तपास लवकरात लवकर करुन...

श्री. दिवाकर रावते : याबाबत संध्याकाळपर्यंत निवेदन करावे.

**सभापती** : निवेदन करण्याची गरज नाही. त्या मुलीला हुडकून काढावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ठीक आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**पृ. शी.** : शहापूर (जि.ठाणे) येथील अनाथ विद्यार्थीनीचे अश्लील फोटो काढण्याचा तसेच वांद्र-पिवळी येथे आदिवासी मुलीवर बलात्कार केल्याची घडलेली घटना

**मु. शी.** : शहापूर (जि.ठाणे) येथील अनाथ विद्यार्थीनीचे अश्लील फोटो काढण्याचा तसेच वांद्र-पिवळी येथे आदिवासी मुलीवर बलात्कार केल्याची घडलेली घटना यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री जगन्नाथ शेवाळे, सदाशिवराव पोळ, राजेंद्र जैन, वसंतराव चव्हाण व श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" शहापूर (जि.ठाणे) शहरातील इयत्ता नववीमध्ये शिकणाऱ्या एका अनाथ विद्यार्थीनीचे गुन्हेगार प्रवृत्तीच्या अकबर शेख व इतर सहकाऱ्यांनी अश्लील फोटो काढून वाटल्याचा आणि वासिंदजवळील वांद्र-पिवळी येथे राहणाऱ्या एका अल्पवयीन आदिवासी मुलीवर बलात्कार केल्याच्या दिनांक 27 जून, 2006 रोजी उघडकीस आलेली धक्कादायक घटना, याप्रकरणी सखोल चौकशी करुन कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील विद्यार्थीनी, महिला व नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची व असुरक्षिततेची भावना, दोषींविरुध्द कारवाई केली जात नसल्याने अशा प्रकारच्या वारंवार होत असलेल्या दुर्घटना, त्या परिसरामध्ये अशा प्रकारचे सेक्स स्कँडल कार्यरत असण्याची शक्यता लक्षात घेता यासंदर्भात उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई आणि शासनाची प्रतिक्रिया "

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ही अत्यंत गंभीर अशा प्रकारची बाब आहे. आपल्या पुरोगामी राज्यामध्ये स्त्रियांचा सन्मान सुरक्षित राहावा यासाठी आटोकाट प्रयत्न केले जात आहेत. महिलांचे सबलीकरण करण्याचा आपला आटोकाट प्रयत्न आहे. असे असताना आपल्या राज्यामध्ये सेक्स स्कँडलचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. जळगाव असेल, सांगली असेल, कोल्हापूर असेल, अहमदनगर असेल या जिल्ह्यांमध्ये देखील अशा प्रकारची अनेक प्रकरणे उघडकीस आली आणि त्यामध्ये अनेक मोठमोठी मंडळी गुंतलेली असल्याचे वर्तमानपत्रांच्या बातम्यांवरुन कळते. सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील इयत्ता नववीमध्ये शिकणाऱ्या अनाथ विद्यार्थीनीचे गुन्हेगार प्रवृत्तीच्या श्री. अकबर शेख व इतर सहकाऱ्यांनी अश्लील फोटो काढून ते वाटले आणि त्यांना ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर वासिंदजवळील वांद्र-पिवळी येथील एका आदिवासी मुलीवर बलात्कार केल्याची घटना 27 जून, 2006 रोजी उघडकीस आलेली आहे. यामध्ये जी बदमाश मंडळी गुंतलेली आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. फक्त गुन्हा दाखल झाला, पोलीस कस्टडीमध्ये आहे, गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे एवढयावर भागणार नाही. बलात्काराची आणि अश्लील फोटो काढण्याची जी घटना आहे असे गुन्हे पुन्हा घडू नयेत यासाठी शासन कठोर अशा प्रकारची उपाययोजना करणार आहे काय ? उपाययोजना करणार असेल तर कोणत्या प्रकारची उपाययोजना करणार आहे ? याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावी.

यानंतर श्री. किल्लेदार.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : संबंधित तीन आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांच्यावर कलम 354 आणि 328 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. कलम 328 मध्ये गुन्हेगाराला 10 वर्षे शिक्षेची तरतूद आहे. हे प्रकरण जलदगती न्यायालयाकडे सोपवून या प्रकरणी कारवाई करण्यात येईल.

डॉ. नीलम गो-हे : या मुलीला गुंगीचे औषध देऊन तिच्या अश्लील फोटोंचा व्यापार झालेला आहे. मुलींच्या लैंगिक शोषणाच्या संदर्भात जो कायदा केलेला आहे तो कायदा असे सांगतो की, अशा प्रकारच्या केसेस तपासताना आणि कोर्टात उभ्या राहाताना तेथील सामाजिक कार्यकर्त्यांची मदत घ्यावी. तसेच जिल्हावार समित्या स्थापन करुन त्या नोटीफाय करण्यात याव्यात. तेव्हा जी.आर.काढून आशा प्रकारच्या नोटीफाय कमिट्या करण्यात येतील काय ? या प्रकरणी गुन्हेगारांवर 120 (ब) हे अजामीन कलम लावून कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : माननीय सदस्यांनी कमिट्या नेमण्यासंबंधीची सूचना केली त्याप्रमाणे सर्व ठिकाणी कमिटया नेमल्या जातील. या प्रकरणी गुन्हेगारांना 134 कलम लावलेले आहे. तसेच गँग रेप असल्यामुळे 176 (ग) आणि 395 ही कलमे देखील लावलेली आहेत. या दोन्ही कलमामध्ये कठोर शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे याप्रकणी 120 (बी) हे कलम लावण्याची आवश्यकता नाही.

श्री. विनोद तावडे : अटक केलेले तीन आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. 26 जूनला गुन्हा घडलेला आहे. गुन्हेगारांना ज्युडिशियल कस्टडी मिळण्या इतका हा गुन्हा साधा आहे काय ? कोर्टामध्ये पोलिसांनी पोलीस कस्टडी मागितली होती काय ? पोलिसांनी पोलीस कस्टडी न मागितल्यामुळे गुन्हेगारांना ज्युडिशियल कस्टडी मिळाली काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : प्रत्येक वेळी पोलीस कस्टडी मागितली जाते. या प्रकरणी देखील पोलीस कस्टडी मागितली.. पोलिसांनी पोलीस कस्टडी मागितली नव्हती असे म्हणता येणार नाही. या प्रकरणी कपडे, इतर नमुने इत्यादी पुरावे मिळालेले आहेत काय असे न्यायालयाने विचारले असता पुरावे मिळालेले असल्याचे पोलिसांनी सांगितले. पुरावे मिळालेले असल्यामुळे पोलीस कस्टडीची आवश्यकता नाही असे सांगून न्यायालयाने त्यांना ज्युडिशियल कस्टडी दिलेली आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : ठाणे आणि शहापूर याठिकाणी या दोन घटना घडलेल्या आहेत. तेथील पोलीस स्टेशनला भेट दिल्यानंतर, पोलिसांची कमतरता असल्यामुळे असे प्रकार घडल्यानंतर तातडीने कारवाई करता येत नाही, असे आम्हाला सांगण्यात येते. शहापूर याठिकाणी पोलीस बळ अपुरे असल्याचे सांगितले जाते. तेव्हा शहापूर याठिकाणी पोलिसांची संख्या किती आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ही माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

--

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात चिकन गुनियाच्या साथीने धारण केलेले उग्र स्वरुप.

**मु.शी.**: राज्यात चिकन गुनियाच्या साथीने धारण केलेले उग्र स्वरुप यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, श्रीकांत जोशी, शांताराम करमळकर, पांडुरंग फुंडकर, प्रकाश शेंडगे, प्रतापराव सोनवणे, सागर मेघे, मधुकर चव्हाण, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री सुरेश जेथलिया, दिवाकर रावते, अरविंद सावंत, अनिल परब, विलास अवचट, डॉ.दिपक सावंत, डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी नियम 101 अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्यात अनेक जिल्हयात फेब्रुवारी/मार्च, 2006 पासून चिकत गुनियाच्या साथीने उग्र स्वरुप धारण केले असणे, काही ठिकाणी औषधोपचाराची सोय झाल्यानंतर साथीची तीव्रता कमी होणे, परंतु अद्यापही कोल्हापूर, इचलकरंजी, सोलापूर, सातारा, अहमदनगर, रायगड, नागपूर, अमरावती व यवतमाळ या जिल्हयांमध्ये तसेच मराठवाडयाच्या काही भागामध्ये जून महिन्यापर्यंत शेकडो रुग्णांना चिकन गुनियाची बाधा होणे, तसेच याच भागातील काही जणांना चिकन गुनिया सदृश्य तापाने ग्रासले असणे, सदर रुग्णांच्या रक्ताच्या नमुन्याचा अहवाल अद्याप प्राप्त न झाल्याने या भागामध्ये ही साथ सुरु आहे किंवा नाही, याविषयी खात्री देता येत नसणे, शासनाने कोटयवधी रुपयांची औषधे खरेदी करण्याचे आदेश देऊनही चिकन गुनिया या रोगास बरे करण्यासाठी लागणारी औषधे खरेदी करण्यात न येणे, शासनाने तातडीने या संदर्भात सावधगिरीची उपाययोजना म्हणून परिसरातील साफसफाई, औषधांची फवारणी, पिण्याच्या पाण्याची तपासणी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते. सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक-2 वरील तिसऱ्या परिच्छेदाच्या शेवटी "येतात" हा शब्द अंतर्भूत करण्यात यावा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2..........

**उपसभापती** : निवेदन सुधारल्याप्रमाणे वितरित करण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, चिकन गुनियाची साथ आली त्याचा परिणाम महाराष्ट्रातील अनेक शहरे आणि अनेक जिल्हयांमध्ये आहे. माझे सिक्युरिटी म्हणून काम करणारे श्री.शिंदे हे लातूर जिल्हयातील असून ते देखील या तापाने आजारी होते. याचे मुख्य कारण काय? पहिली गोष्ट म्हणजे दूषित पाण्याचा पुरवठा हे कारण आहे का? तसे असेल तर या सगळया भागातील पाण्याचे नमुने चेक केलेले आहेत का?त्यामध्ये काय आढळले, या आजारावर प्रभावी औषधोपचार कोणते आहेत, ते केले किंवा नाही, नीट औषधोपचार होतात की नाही, शासनाने या संदर्भात काय कारवाई केली?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, चिकन गुनिया नावाचा आजार हा डासांपासून होणारा आहे. दूषित पाण्यामुळे होत नाही. 7-8 दिवस जे पाणी साठविले जाते किंवा नारळाच्या करवंट्या, जुने टायर, इमारतीची बांधकामे होतात ही डासांची ब्रिडिंग प्लेस आहेत. ईडीसी इजिप्टा फिमेल मॉस्किटो चावल्यानंतर हा आजार होतो. ही पूर्णपणे मॅन टू मॉस्किटो अशी सायकल चालू असते. टांझानिया या देशातून आलेला हा शब्द आहे. या आजारामुळे पूर्ण अंग लुळे पडल्याच्या तक्रारी येतात. पूर्णपणे बरा होणारा हा ताप आहे. पूर्णतः मराठवाडा, नगर, नागपूर या भागात हा आजार बळावला. शासनाने ही साथ नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. हेडेक आणि बॉडेक हे अँटी इन्फ्लामेटरीमधून दुरुस्त होते. आयब्रुफेन, पॅरासिटेमॉल या गोळयांनी हा आजार नियंत्रणात आणू शकतो. पूर्णपणे बरा होणारा हा आजार आहे. विधिमंडळाच्या माध्यमातून 2-3 वेळा लक्षवेधी सूचनांवर चर्चा झालेली आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. कर्नाटक आणि आंध्रप्रदेश राज्यातील काही भागातील साथीची परिस्थिती नियंत्रणात न आल्यामुळे आपल्या राज्यात होणारे मायग्रेशन, पंढरीच्या वारीसाठी, आषाढी एकादशीसाठी लोक येतात त्यामुळे प्रसार होतो. ही डेन्सिटी कमी करण्याचा आरोग्य विभागाच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहोत. यावर उपाय म्हणजे कोरडा दिवस पाळणे महत्वाचे आहे. 7-8 दिवसापेक्षा जास्त पाणी साठवू नये अशा प्रकारची उपाययोजना आपण या माध्यमातून करीत आहोत. यावर कोणतीही लस उपलब्ध नाही. साध्या पॅरासिटेमॉल गोळीमुळे आजार बरा होऊ शकतो. ब्रिडिंग प्लेसेस कमी करण्यासाठी फॉगिंग करण्यात येते. ही साथ अँटी लारव्हल आहे. पाणी साठलेल्या जागेच्या ठिकाणी 2-3 थेंब डेमोफॉस टाकल्यामुळे डेन्सिटी कमी होते.

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्रात ही साथ नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केला आहे. आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्याच्या बॉर्डरच्या गावात साथ नियंत्रणात आणण्यासाठी सचिवांनी आरोग्य विभागाची बैठक घेतली, त्यांनी सुध्दा योग्य त्या सूचना दिल्या आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा ...

उत्तरामध्ये जी माहिती दिलेली आहे त्याप्रमाणे चिकन गुनियाच्या संदर्भात संपूर्ण उपाययोजना करण्यात आलेली आहे. चिकुन गुनिया नियंत्रणात आणण्याचे आपण सर्व प्रयत्न केलेले आहेत.

श्री. श्रीकांत जोशी : उप सभापती महोदय, सगळयात महत्वाची अडचण अशी आहे की, आरोग्य विभागाला चिकन गुनियाचे गांभीर्य काळले असून देखील ते यासंदर्भात लक्ष घालीत नाही. लक्षेवधी सूचनेच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, जिल्हा सातारा,रायगड,इचलकरंजी ( जि.कोल्हापूर) व मराठवाडयातील उर्वरित 7 जिल्हयात माहे जून, 2006 महिन्यात चिकन गुनिया तापाची साथ नाही. सभापती महोदय, एकटया संभाजी नगरात 10 हजार व्यक्तींना चिकन गुनियाच्याची लागण झालेली आहे. संपूर्ण राज्यातून जवळपास काही लाख रुग्णांना या रोगाची लागण झालेली आहे. संभाजी नगरमध्ये 27 पैकी 2 व्यक्तींना चिकन गुनियाच्याची लागण झाल्याचे सिध्द झालेले आहे. चिकन गुनियामुळे वैजापुरचे महापौर, उपमहापौर तसेच अधिकारी आजारी पडलेले आहे. खरे म्हणजे संपूर्ण मराठवाडा चिकन गुनियामुळे आजारी पडलेला आहे. भोकरदनचे आमदार श्री. दानवे साहेब सुध्दा चिकन गुनियाने आजारी पडले होते. खरे म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रातील एक लाख लोक चिकन गुनियाच्या तापाने फणफणत आहेत. माननीय आरोग्य मंत्री बीड जिल्हयाचे असल्यामुळे तेथेच आरोग्य अधिकारी लक्ष देत आहेत. त्यामुळे माझा प्रश्न वजा सजेशन असे आहे की, आरोग्य विभाग केवळ सरकारी दवाखात्यातून जी काही आकडेवारी मिळते त्यावरुनच निष्कर्ष काढीत असतात परंतु खाजगी रुग्णालयामध्ये सुध्दा असंख्य रग्ण उपचार घेत असतात त्यामुळे आरोग्य विभागाने खाजगी रुग्णालयातून सुध्दा यासंदर्भातील आकडेवारी गोळा करावी व ही आकडेवारी गाव निहाय किती दिवसात देण्यात येईल? चिकन गुनियामुळे सलाईनचा सेल 100 कोटी रुपयांनी वाढलेला आहे. एका बाजूला चिकुनगुन्याची प्रचंड प्रमाणात लागण झालेली असतांना त्याच्यावर उपाययोजना करण्यासाठी ग्रामविकास व महसुल विभागाची सुध्दा आरोग्य विभागाने मदत घ्यावयास पाहिजे होती परंतु तशा प्रकारची मदत त्यांच्याकडून घेण्यात आलेली नाही. पावसाळा सुरु होण्यापूर्वीच चिकन गुनियाचा डास जिवंत राहणार नाही याची काळजी घ्यावयास पाहिजे होती परंतु तशा प्रकारची काळजी आरोग्य विभागाने घेतलेली नाही. उलट आरोग्य विभागाने त्यावर पांघरुण घालण्याचे काम केलेले आहे. खरे म्हणजे सरकारी आणि खाजगी दवाखान्यातून चिकन गुनियाच्या रुग्णांची संख्या

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी.......

गोळा करणे हे काही सोपे काम नाही. चिकन गुनियावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या संदर्भात त्वरीत उपाययोजना करावी तसेच चिकन गुनियाच्या संदर्भात संबंधित लोकप्रतिनिधींबरोबर एक बैठक घ्यावी.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, या ठिकाणी मी संपूर्ण मराठवाडया आऊट ब्रेक दिलेला आहे. मराठवाडयातील उर्वरित सात जिल्हयातील तापाची साथ निवळलेली आहे. आपण सांगितल्या प्रमाणे माझ्याकडे गावानिहाय व व्यक्तीनिहाय तसेच संपूर्ण महाराष्ट्राची जिल्हानिहाय माहिती उपलब्ध आहे. आपल्याला ही संपूर्ण माहिती पाहिजे असेल तर ती आपल्याला उपलब्ध करुन देण्यात येईल किंवा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. तसेच चिकन गुनियाच्या संदर्भात उत्तरामध्ये संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. मध्यंतरी बीड जिल्हयात तापाचा उद्रेक झाला होता. जानेवारी ते मे या महिन्यात तापाचा उद्रेक अधिक प्रमाणात होता. दिनांक 2.7.2006 पासून बीड वगळता चिकन गुनियाचे रुग्ण कोठेही आढळून आलेले नाहीत. यासंदर्भातील संपूर्ण माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, दैनिक लोकमत आणि सकाळ या वर्तमानपत्रात महापौर, उपमहापौर नगराध्यक्ष आजारी असल्याची बातमी आलेली आहे.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, ट्रिटमेंट चालू आहे. आम्ही कोणत्याही प्रकारची अडचण येऊ देणार नाही.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, महापौर, नगराध्यक्ष, आमदार व खासदार या साथीने आजारी पडत आहेत आणि त्याची माहिती आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना नाही. म्हणजे शासन किती गंभीर आहे याची आपणास कल्पना येते.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, चिकन गुनिया हा व्हायरल रोग आहे. हा आजार 10 ते 15 दिवस राहतो. ....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्याकडे बॉडीगार्ड असलेले श्री.शिंदे हे लातूरला राहणारे असून ते आजारी असल्यामुळे दोन महिन्याच्या सुट्टीवर होते. त्याने मला सांगितले की, आमच्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर लोक आजारी आहेत. तेव्हा माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, फक्त शासकीय रुग्णालयातून माहिती न घेता खाजगी रुग्णालयातून देखील माहिती घेणे आवश्यक आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे हा व्हायरल रोग आहे. हा आजार 10 ते 15 दिवस राहतो. लातूर जिल्ह्यामध्ये 48,000 केसेस आहेत. परंतु बीड जिल्ह्यामध्ये एकही केस नाही असे माझे म्हणणे नाही. परंतु मी आजची परिस्थिती सांगितली. चिकन गुनियावर औषध नाही. हा व्हायरल डिसीज आहे. या डिसीजवर अँटीबायोटीक्स औषध दिले जाते.

श्री.श्रीकांत जोशी : हा रोग पूर्णपणे नष्ट करण्यासाठी आपल्याकडे प्रभावी यंत्रणा आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सद्य:स्थितीत सर्वात जास्त केसेस नागपूर डिव्हीजनमध्ये आहेत. आम्ही 21 तारखेला जिल्हाधिकारी, सीईओ, आयुक्त यांचेबरोबर एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये ग्रामसेवक, सरपंच, जिल्हापरिषदेचे सदस्य, ग्रामसभेचे सदस्य यांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे.........

या आजारा विषयीची कल्पना देऊन उपाययोजना करण्याबाबत माहिती दिली. गावापासून तीन कि.मी.च्या अंतरावर फॉगिंग करणे, डासांचा नायनाट करणे इत्यादी उपाय योजना करण्यास सांगितले आहे. नागपूर विभागातील सदस्य श्री.रमेशचंद्र बंग आणि मंत्रिमहोदय श्री.अनिल देशमुख यांनी आम्हाला स्कीम राबविण्यासाठी खूप सहकार्य केले. आम्ही लोकल टी.व्ही.वर देखील या आजाराबाबत माहिती दिलेली आहे. आम्ही सर्व जिल्ह्यांमध्ये फॉगिंग मशीन देण्यासाठी आणखी जादा फॉगिंग मशीन खरेदी करीत आहोत.

-----------

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक तीनबाबत.**

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक तीन पुढे ढकलण्यात आली आहे.

श्री.सुनील दत्त : सभापती महोदय, सदरहू तीन क्रमांकाची लक्षवेधी सूचना उद्या घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांच्या भावना माननीय सभापती यांना कळविल्या जातील.

-----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दत्तक संस्थांमधून मुले दत्तक घेणे व देणे या नावाखाली मुलांचा सर्रास सुरु असलेला अवैध व्यापार

**मु.शी.**: दत्तक संस्थांमधून मुले दत्तक घेणे व देणे या नावाखाली मुलांचा सर्रास सुरु असलेला अवैध व्यापार याबाबत डॉ.नीलम गो-हे सर्वश्री अरविंद सावंत, अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"दिनांक 20 जून, 2006 रोजी सीएनएन-आयबीएन या खाजगी दूरचित्रवाहिनीवरुन पुण्यातील "प्रितमंदिर" व "माता वैष्णवदेवी ट्रस्ट" पुणे या दत्तक संस्थांमधून मुले दत्तक घेणे व देणे या नावाखाली मुलांचा सर्रास सुरु असलेला अवैध व्यापार, निवासी संस्था अंतर्गत मुलांचे गुणवत्तापूर्ण संगोपन व पर्याय अभियान, महाराष्ट्र या संस्थेने या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची केलेली मागणी, दिनांक 21 जून,2006 रोजी पुण्यातील झालेल्या बैठकीत सामाजिक संस्था, संघटना व नेटवर्कच्या सभासदांनी दूरचित्रवाणीवरुन प्रसिध्द झालेली स्टींग ऑपरेशनद्वारे प्रितमंदिरच्या दत्तक व्यवस्थेबाबत दाखविण्यात आलेल्या माहितीचा केलेला तीव्र निषेध, या दत्तक घेणाऱ्या संस्थांनी व्यापार काढल्याने जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता."

श्री.हर्षवर्धन पाटील ( महिला व बालविकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, "प्रितमंदिर" संस्थेसंदर्भात शासनाने जी काही कारवाई केली आहे त्यासंदर्भात काही उत्तरे समाधानकारक आली आहेत, त्या कारवाईबद्दल प्रथम मी शासनाची आभारी आहे. याबाबतीत मला शासनाकडून आणखी काही माहिती हवी असून याबाबतीत काही धोरणात्मक निर्णय शासनाकडून मला अपेक्षित आहेत. त्यातील पहिला मुद्दा असा की, ॲडॉप्शनचा कायदा संपूर्ण भारतभर लागू आहे. तो कायदा प्रितमंदिर संस्थेला लागू केला. मागे 12 हजार डॉलर्सचा मुला-मुलींचा व्यापार करण्यात आला. अशाप्रकारे संघटीतपणे शरीरविक्रय व माणसांची विक्री करणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे. त्यामध्ये गुन्हेगारांना कायद्याच्या कलमान्वये आपण ॲक्शन घेतलेली नाही. त्यांनी गुन्हेगारीच्या स्वरुपाचा भंग केला असल्यामुळे सी.आय.डी.ची मदत घेणे आवश्यक आहे. याचे कारण असे आहे की, गेल्या पाच वर्षामध्ये त्यांनी अनेक मुलांना आणून परदेशी लोकांना दिलेले आहे. त्यातील अनेक मुले आंध्रप्रदेशातील व इतर राज्यातील गरीब आई वडिलांची असल्याची माहिती समोर येत आहे. अशा प्रकारे आई वडिलांकडून मुले नेली जातात. याबाबतचा डाटा आपण ताब्यात घेतला पाहिजे. यासंदर्भात सीएनएनने सहा जागेच्या संदर्भात स्टींग ऑपरेशन केले. साऊरकेला, लंडन, पुणे व भारतातील काही भागामध्ये असे स्टींग ऑपरेशन करण्यात आले. अशा प्रकारचा हा राष्ट्रीय प्रश्न असून तरीही ॲडॉप्शन घेण्याचे काम चालू आहे. या सर्व व्यवहारांवर स्थगिती आली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. तसेच, याबाबतीत आपण प्रशासक नेमला पाहिजे. आजच्या प्रसंगी आपण त्यांचे रेकॉर्डही डिस्ट्रॉय करु शकता. दुसरे असे की, प्रितमंदिर संस्थेचे लायसन्स काढून घेतले होते, ते त्यांना परत कसे मिळाले ? आपण आपल्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, आमचा सोशल वेलफेअर विभाग याबाबतीत सगळी काळजी घेत आहे. तसेच, याबाबतीत आपण भाजी निवडण्यासारखे मुले निवडण्याची परवानगी दिली आहे. अशा प्रकारचा सर्व कारभार चालू आहे. याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, या संस्थेचे लायसन्स जप्त करावे. त्यांना फक्त नोटीसा बजावणे हे पुरेसे नाही. त्यांची लायसन्स आपण जप्त केली पाहिजेत. तसेच, व्हॉलेंटरी एजन्सी ऑफ ॲडॉप्शन ही जी पुण्यातील संस्था आहे त्या संस्थेचा आताच्या आता व्यवहार थांबविला पाहिजे व यासाठी आपण त्या संस्थेचे पूर्वीचे रेकॉर्ड तपासणार का ? तसेच, या संस्थेवर आपण प्रशासक नेमणार का ?

..4....



SSP/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.अजित... 15:25

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो अतिशय गंभीर आहे. प्रितमंदिर या संस्थेच्या ॲडॉप्शनसंदर्भात जे स्टींग ऑपरेशन झाले त्याची सी.डी. मी स्वत: पाहिलेली आहे. त्यामध्ये साधारणत: 6 लाख ते 10 लाख रुपयापर्यंत फॉरेन ॲडॉप्शनच्या माध्यमातून रक्कम मागितली होती, असे त्यामध्ये दिसून आलेले आहे. याबाबतीत आम्ही तात्काळ केंद्र सरकारची जी कारा नावाची संस्था आहे त्या संस्थेला आमच्या सचिवांच्या मार्फत कळविले असून त्या संस्थेचे लायसन्स सस्पेंड करावे, अशी विनंती केली आहे. त्याचबरोबर महिला बाल विकास आयुक्त यांच्या कार्यालयामध्ये या प्रकरणाची चौकशी करण्याच्या दृष्टीने तात्काळ उपायुक्तांची नेमणूक करावी, अशी विनंतीही केली आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील..........

सभापती महोदय, साधारणपणे याचा तपास चालू आहे व यासंदर्भातील सगळी माहिती गोळा करण्यात आली आहे. गेल्या 3/4 वर्षामध्ये ॲडॉपशनच्या केसेस झालेल्या आहेत त्या सर्व केस-टू-केस व्हेरिफाय करण्याचे काम विभागाच्या वतीने चालू आहे. निश्चित स्वरुपामध्ये एक महिन्याच्या आत चौकशी पूर्ण होईल, असा अंदाज आहे व तशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. दरम्यानच्या काळामध्ये 20 तारखेपासून पुढे ॲडॉपशन फॉरेन कन्ट्रीमध्ये केले जाणार नाही, विदिन स्टेट करता येणार नाही, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेले आहेत. दुर्दैवाने आपल्या देशात ॲडॉपशनसंबंधी कायदा नाही. सर्वोच्च न्यायालयाने जे आदेश दिले होते त्यानुसार यासंदर्भातील रुल्स फ्रेम करण्यात आलेले आहेत व त्यानुसार नियमन करण्यात येत आहे. केंद्र सरकारने यासंदर्भातील कायदा तयार करावा, यासाठी राज्य सरकार पुढाकार घेण्यास तयार आहे, अशी विनंती करण्यात येणार आहे. ॲडॉपशन करण्यासाठी इंटरकंट्री लायसन केंद्र सरकारच्या 'कारा' या संस्थेमार्फत देण्यात येते. विदिन स्टेट आणि इंटरस्टेट ॲडॉपशनचे लायसन देण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत. या प्रकरणी चौकशी पूर्ण झाल्यानंतर संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल. आवश्यकता भासली तर पोलीस केसेसही दाखल करण्याबाबत कारवाई करण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : प्रितमंदिर या संस्थेच्या अनेक ठिकाणी शाखा आहेत. त्या शाखांमधून हेच धंदे चालतात. तळेगाव या ठिकाणी देखील या संस्थेची शाखा आहे. गैरव्यवहारासंबंधीची कारवाई टाळण्यासाठी पुरावे नष्ट करण्याचे काम या संस्थेकडून होऊ शकते. त्यामुळे या संस्थेचे लायसन रद्द करुन संस्थेवर प्रशासक नेमण्याची कारवाई शासन करणार काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, प्रशासक नेमण्याची कार्यवाही राज्य सरकारला करता येणार नाही. कारण, लायसन देण्याची कार्यवाही ही केंद्र सरकार व राज्य सरकारमार्फत संयुक्तपणे केली जाते. त्यामुळे तातडीने प्रशासक नेमता येणार नाही. चौकशी पूर्ण होऊन अहवाल प्राप्त होईपर्यन्त या संस्थेच्या जेवढया शाखा आहेत त्या सर्व शाखांमधून यापुढे कुठल्याही परिस्थितीत ॲडॉपशनचे काम करता येणार नाही, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

..2..........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, प्रीतमंदिरसारख्या अनेक संस्था राज्यात कार्यरत आहेत. त्यांना लायसन्स देण्याबाबतचा कायदा राज्यात आस्तित्वात आहे काय ? तसेच, या संस्थांचे ऑडिट, तपासणी वगैरे कामे केली जातात काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, प्रीतमंदिरबरोबरच वैष्णोदेवी ट्रस्ट या संस्थेसंदर्भात देखील तक्रार प्राप्त झाली आहे. अशा प्रकारच्या 55 ते 57 संस्था या राज्यामध्ये कार्यरत आहेत. देशामध्ये होणा-या एकूण ॲडॉप्शनच्या केसेसमध्ये 40 टक्के केसेस या महाराष्ट्रात होतात. इतर राज्यातील लोकही महाराष्ट्रामध्ये ॲडॉप्शन करण्यास प्राधान्य देतात. यामधील सर्वच संस्था बोगस काम करतात असे नाही तर अनेक संस्था अतिशय चांगले काम करीत आहेत. एखाद्या संस्थेने अनियमितता केली म्हणून सर्व संस्थांना दोष देता येणार नाही. यापूर्वी विभागानेही या विषयाकडे फारसे गांभीर्याने पाहिलेले नाही. परंतु, आता हे प्रकरण समोर आल्यामुळे यासंदर्भात काळजी घेण्यात येत आहे. यासंदर्भात आपल्याही काही सूचना असल्यास त्या शासनाकडे द्याव्यात, त्या निश्चित स्वीकारल्या जातील. तसेच ॲडॉप्शन प्रमोट करण्याबरोबरच काही चुकीचे होत असेल तर ते थांबविण्याबाबत योग्य ती खबरदारी घेतली जाईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, किती दिवसात कारवाई केली जाईल ?

श्री.हर्षवर्धन पाटील : एक महिन्याच्या आत यासंदर्भातील चौकशीचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.

-----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>.**

**पृ. शी.** : केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कार्यालयांमध्ये अनेक वर्षापासून हंगामी किंवा रोजंदारी तत्वावर काम करणा-या कर्मचा-यांना नोकरीत कायम करणे.

**मु. शी.** : केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कार्यालयांमध्ये अनेक वर्षापासून हंगामी किंवा रोजंदारी तत्वावर काम करणा-या कर्मचा-यांना नोकरीत कायम करणे यासंबंधी श्री.संजय दत्त वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री.संजय दत्त यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय दत्त (महाराट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध विभागात सार्वजनिक उपक्रम आणि निम सरकारी कार्यालयांमध्ये गेले अनेक वर्षे हंगामी किंवा रोजंदारी तत्वावर काम करणा-या कर्मचा-यांची संख्या हजारोंच्या घरात आहे. नोकरीमध्ये कायम करण्यात यावे अशी या कर्मचा-यांची मागणी आहे. त्या अनुषंगाने राज्यातील अनेक कामगार संघटनांनी लोकशाही मार्गाने शासनाकडे तसेच न्यायालयाकडे अर्ज विनंत्या आणि याचिकाद्वारे दाद मागितली आहे. असे असतांना सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच निर्णय देऊन हंगामी कामगारांचा कायम नोकरीचा मार्ग बंद केला आहे. या निर्णयामुळे वर्षानुवर्षे विनाखंडीत सेवेत असलेल्या कर्मचा-यांवर ख-या अर्थाने आघात होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी आता सर्वस्वी लोकप्रतिनिधींकडे अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. यासंदर्भात नवी मुंबई म्युनिसिपल मजदूर युनियननेही 11 जुलै, 2006 रोजी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. अशीच आंदोलने राज्यभर होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. राज्यातील हजारो हंगामी कर्मचा-यांना कायम करण्याच्या दृष्टिने सवौच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात फेरविचार होण्याची आवश्यकता आहे व त्यासाठी राज्य शासनाने आपले विचार कळविणे जरुरीचे आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टिने अत्यंत महत्वाच्या या मुद्याचा मी विशेष उल्लेखाद्वारे सन्माननीय सभागृहाचे व शासनाचे लक्षवेधू इच्छित आहे.

---------

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रायगड जिल्हयातील नवगाव, आवास, वरसोली भागांना उधाणाचा धोका संभवणे.

**मु. शी.** :रायगड जिल्हयातील नवगाव, आवास, वरसोली भागांना उधाणाचा धोका संभवणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधनसभ सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यातील नवगाव, आवास व वरसोली या गावांना पावसाळयातील उधाणाचा धोका संभवतो आहे. भरतीचे पाणी गावात घुसून मोठी हानी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आर.सी.एफ. कंपनीच्या मागील बाजूस समुद्रकिनारी नवेदर नवगाव हे गाव आहे. सहा हजार लोकवस्तीच्या या गावात कोळी समाजाची वस्ती आहे. समुद्रकिनारी जेथे मासळीची गलबते लागतात, तेथे जुना वाळूचा नैसर्गिक बंधारा आहे. त्याची धूप होऊन तो नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्या ठिकाणी त्वरित बंधारा न बांधल्यास उधाणाचे पाणी गावात शिरण्याचा धोका आहे. तसे झाल्यास मासळी सुकवण्यासाठी जागाही शिल्लक राहणार नाही.

आवास येथील बंधा-यासाठी 99 लाख तर नवगाव येथील बंधा-यासाठी 12 लाखांचा निधी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने मंजूर केल्याचे सांगण्यात आले. तर वरसोली येथील बंधा-याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे. खडकवासला येथील सेंट्रल वॉटर ॲण्ड रिसर्च स्टेशनच्या अधिका-यांनी नवगाव येथे भेट देऊन जागेची पाहणी केली आहे. तरी याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

--------

...3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दहावीच्या परीक्षेत राज्यातील आठ विभागीय मंडळांपैकी 7 ठिकाणी मुलींनी पहिला क्रमांक मिळविल्याने त्या विद्यार्थीनी व त्यांचे पालक व शिक्षक यांचे अभिनंदन करणे.

**मु. शी.** : दहावीच्या परीक्षेत राज्यातील आठ विभागीय मंडळांपैकी 7 ठिकाणी मुलींनी पहिला क्रमांक मिळविल्याने त्या विद्यार्थीनी व त्यांचे पालक व शिक्षक यांचे अभिनंदन करणे याबाबत डॉ.नीलम गो-हे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्या डॉ.नीलम गो-हे यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

दहावीच्या परीक्षेत राज्यातील आठ विभागीय मंडळांपैकी सात ठिकाणी मुलींनी पहिला क्रमांक मिळविला आहे. त्याच सोबत अपंग, रात्रशाळा, उत्तीर्ण होण्याचे प्रमाण यातही मुलींची आघाडी आहे. मुंबईत पहिले तीनही क्रमांक मुलींनी मिळविले आहेत. मुलींची ही प्रगती म्हणजे महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या परंपरांचा परिणाम आहे असे म्हणून यशस्वी विद्यार्थीनी, त्यांचे पालक शिक्षक यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे.

मुलींची अक्कल वा कमीपणा यांची हेटाळणी करण्यासारखी परिस्थिती राहिलेली नाही, उलट संधी मिळाल्यास मुली त्यांची गुणवत्ता सिद्ध करु शकतात. सातत्य, परिश्रम व बुद्धीमत्ता या आधारे स्त्रियांची क्षितीजे विस्तारत चालल्याचे हे एक सुचिन्ह आहे. गेल्या काही वर्षाचा ट्रेड पाहिला तर सातत्याने मुलांनी पाठी राहणे याबाबत मानसशास्त्रीय अभ्यासही गरजेचा आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थीनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतांनाच ज्यांना अपेक्षित यश मिळाले नाही त्यांनी ही परीक्षा एक रंगीत तालीम मानून पुढील परीक्षांच्या तयारीला उमेदीने लागावे. विद्यार्थीनींची ही आघाडी महाराष्ट्राला अभिमानास्पद असून शासनाने खास अभिनंदन करावे.

----------

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 15:40

**पृ.शी.** : महाराष्ट्रात पंतप्रधान ग्रामसडक योजनेची कामे पूर्ण न होणे.

**मु.शी.** : महाराष्ट्रात पंतप्रधान ग्रामसडक योजनेची कामे पूर्ण न होणे याबाबत श्री.श्रीकांत जोशी,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी 'विशेष उल्लेखा'ची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" महाराष्ट्रात पंतप्रधान ग्रामसडक योजनेची कामे पूर्ण न होणे, तसेच मराठवाड्यातही बऱ्याच जिल्ह्यात कामे अपूर्ण राहणे, कामे पूर्ण न झाल्याने केंद्र सरकारकडून या योजनेचा पुढील हप्ता न मिळणे, त्यामुळे महाराष्ट्राचे मोठे आर्थिक नुकसान होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. हा विषय अत्यंत महत्वपूर्ण असल्याने तो मी 'विशेष उल्लेख' द्वारे सभागृहात उपस्थित करू इच्छितो. "

सभापती महोदय, भारताचे माजी पंतप्रधान माननीय श्री. अटलबिहारी बाजपेयी यांनी पंतप्रधान ग्राम सडक योजनेची सुरूवात केली. या योजनेतून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला चांगला निधी दिला जात असताना देखील महाराष्ट्राच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये या योजनेतील कामे रेंगाळत चालली आहेत अशी परिस्थिती आहे. संभाजी नगर म्हणजेच औरंगाबाद जिल्ह्याचे उदाहरण द्यावयाचे तर पहिल्या फेजची कामे अजूनही पूर्ण झालेली नाहीत आणि दुसऱ्या व तिसऱ्या फेजची 10 कामे अजूनही अपूर्ण आहेत तर चौथ्या फेजची कामे अजून सुरू न केल्याने पाचव्या व सहाव्या फेजचे पैसे राज्याकडे येऊच शकत नाही अशी परिस्थिती आहे. ग्रामीण भागातील पंतप्रधान ग्राम सडक योजनेची अमलबजावणी महाराष्ट्राने एखाद्या विशिष्ट वेगळ्या अधिकाऱ्यामार्फत करण्याची गरज आहे. या योजनेतील राज्याला 50 कोटी रूपये मिळण्याची शक्यता असताना दुर्दैवाने याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष झालेले आहे. याचे निकष अत्यंत कठीण आहेत आणि यातील कामे चांगलीच करावी लागतात आणि बोगस कामे करून या कामामधून कंत्राटदारांना पळून जाता येत नाही. त्यामुळेच ही कामे जास्त घेतली जात नाहीत. याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. म्हणूनच मी या 'विशेष उल्लेख' द्वारे या गंभीर विषयाकडे सभागृहाचे, पर्यायाने सरकारचे

.... जीजी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

लक्ष वेधू इच्छितो आणि अपेक्षा व्यक्त करतो की, याच्या उत्तरात पुढील वर्षापासून या योजनेतील कामांच्या निविदा निघण्यापासून काम पूर्ण होईपर्यंतची प्रक्रिया कशी होईल याचे विवेचन असावे. धन्यवाद.

***

....... जीजी 3 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 15:40

**पृ.शी.** : माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील अर्धवेळ ग्रंथपालांना पाच वर्षे सेवा पूर्ण झाली असल्यास पूर्ण वेळ करण्याबाबत.

**मु.शी.** : माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील अर्धवेळ ग्रंथपालांना पाच वर्षे सेवा पूर्ण झाली असल्यास पूर्ण वेळ करण्याबाबत श्रीमती संजीवनी रायकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी 'विशेष उल्लेख'ची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

" माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याच्या प्रक्रियेमध्ये बऱ्याच त्रुटी आहेत. मुलांची वाचनाची आवड वाढविण्यासाठी प्रत्येक शाळेत एक तरी ग्रंथपाल असणे आवश्यक आहे. विद्यार्थी संख्या 500 पेक्षा अधिक असल्यास व अर्धवेळ ग्रंथपाल म्हणून 5 वर्षे सेवा पूर्ण झाली असल्यास त्या ग्रंथपालाला पूर्णवेळ करण्यात यावे. हा विषय अत्यंत महत्त्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात 'विशेष उल्लेख'द्वारे मांडू इच्छिते. "

सभापती महोदय, राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्ण वेळ करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. महाराष्ट्रात जवळपास 1644 ग्रंथपाल अर्धवेळ अनेक वर्षांपासून आहेत त्यातील 924 अर्धवेळ पदे चिपळूणकर समितीच्या निकषानुसार पूर्णवेळ करणे आवश्यक आहे कारण तेथील पटसंख्या एक हजार विद्यार्थीसंख्येवर झाली असेल तर तेथील अर्धवेळ ग्रंथपालाला पूर्णवेळ केले जाते. पण तरीही राज्यातील 1644 अर्धवेळ ग्रंथपाल पदांपैकी काही पदे पूर्णवेळ झाल्यावर 720 पदे कायमची अर्धवेळ राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुन्हा जर चिपळूणकरांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली तर नवीन निकष बदलून ते हा अन्याय दूर करतील. कारण शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे नको त्या ठिकाणी विनाअनुदान तत्त्वावर शाळा सुरू करण्यास परवानगी दिली गेली. त्यामुळे विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे. असे होत राहिले तर अर्धवेळ ग्रंथपाल पूर्णवेळ कधीच होणार नाहीत. त्यातच 1990 पासून भरती बंद केल्याने रिक्त पदे भरलीच गेली नाहीत. इतकेच नाही तर एखाद्या शाळेची पटसंख्या 1000 वर गेली की अन्य शाळेतील अर्धवेळ शिक्षकाची त्या

...... जीजी 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती रायकर .....

शाळेत बदली होते. मूळच्या शाळेतील अर्धवेळ ग्रंथपाल दुसऱ्या शाळेत गेला की त्याच्या मूळच्या शाळेत ग्रंथपालाची नेमणूकच होत नाही. असे झाले तर विद्यार्थ्यांना, शिक्षकांना संदर्भग्रंथ, पुस्तके कोण देणार ? हल्ली दिवसेंदिवस मुलांची वाचनाची आवड कमी होत आहे अशा वेळी मुलांना पुस्तके न देऊन त्यांच्या या प्रवृत्तीला खतपाणीच घातले जाईल. यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा ग्रंथपाल महासंघाच्या मागणीनुसार सर्व अर्धवेळ ग्रंथपालांना 500 विद्यार्थी संख्या झाल्यानंतर तसेच ग्रंथपालाची 5 वर्षे सेवा पूर्ण झाली असेल तर त्या सर्व ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्यात यावे अशी विनंती मी या 'विशेष उल्लेख'द्वारे करीत आहे.

***

....... जीजी 5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : श्री.रा.वि.पोकळे,प्राचार्य,अंध विद्यालय,चिखलदरा हे जुलै 2004 मध्ये सेवानिवृत्त झाले. त्यांना 2 वर्षे मुदतवाढ देण्याबाबत मान्यता देऊनही आदेश न काढणे.

**मु.शी.** : श्री.रा.वि.पोकळे,प्राचार्य,अंध विद्यालय,चिखलदरा हे जुलै 2004 मध्ये सेवानिवृत्त झाले. त्यांना 2 वर्षे मुदतवाढ देण्याबाबत मान्यता देऊनही आदेश न काढणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी 'विशेष उल्लेख'ची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" श्री. रा.वि.पोकळे हे अंध विद्यालय, चिखलदरा या शाळेत प्राचार्य म्हणून सेवेत असून 31.7.2004 रोजी सेवानिवृत्त झाले. मेळघाट विभागात त्यांनी अंधांसाठी केलेल्या समाजाभिमुख कामाची दखल घेऊन श्री. पोकळे यांना 2 वर्षे मुदतवाढ देण्याबाबत राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था, अमरावती यांनी शिफारस केली असून तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी ख्वा ास बाब म्हणून मान्यता दिलेली असूनही शासनाने मुदतवाढ देण्याचा आदेश काढलेला नाही. गेली सुमारे 2 वर्षे ते विना वेतन तेथे सेवा करीत आहेत. त्यांना मान्यता व वेतन देऊन एका अंध शिक्षकास मदत होण्यासाठी मी हा 'विशेष उल्लेख' करीत आहे. "

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाशी संबंधित असा विषय मी आपल्यापुढे मांडून एका अंध शिक्षकाच्या व्यथेकडे आपले लक्ष वेधणार आहे. सभापती महोदय, श्री.रा.वि.पोकळे हे 100 टक्के अंध असून ते अंध विद्यालय, चिखलदरा या शाळेमध्ये काम करीत होते. मेळघाट भागातील अंध शाळेमध्ये प्राचार्य म्हणून काम करीत असताना त्यांना राष्ट्रपती पुरस्कार देखील मिळालेला आहे. असे हे श्री. रा.वि.पोकळे दिनांक 31.7.2004 रोजी सेवानिवृत्त झाले. पण त्यांनी केलेले समाजाभिमुख काम लक्षात घेऊन तेथील एक प्रमुख संस्था, राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था,अमरावती यांनी त्यांना मुदतवाढ मिळावी म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांचेकडे निवेदन दिले आणि माननीय मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी देखील त्यांची सेवा लक्षात घेऊन त्यावेळी खास बाब म्हणून त्यांना दोन वर्षांची मुदतवाढ दिलेली आहे. त्यानंतर आता

...... जीजी 6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते ....

31.6.2006 ला त्यांची ही वाढीव मुदत संपत आली आहे. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्यता देऊनही त्यांच्या मुदतवाढीचे आदेश आजपर्यंत काढण्यात आलेले नाहीत त्यामुळे ते प्राचार्य म्हणून तेथे गेली दोन वर्षे तेथे विनावेतन काम करीत आहेत, त्यांना गेल्या दोन वर्षापासून वेतन मिळालेले नाही. तेव्हा त्या दोन वर्षाच्या त्यांच्या सेवेला मान्यता देऊन त्याबाबतचे आदेश काढावेत तसेच त्या काळातील त्यांचे वेतनही त्यांना तातडीने देण्यात यावेत. यासाठी सामाजिक न्याय विभागाने पुढाकार घ्यावा यासाठी म्हणून मी हा विषय 'विशेष उल्लेख' द्वारे येथे मांडला आहे. त्याची आपण दखल घ्यावी ही विनंती.

*****

( यानंतर श्री. सरफरे ..... एचएच 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मीरा भाईंदर ते डहाणूपर्यंत वेगळया पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करणे.

मु.शी. : मीरा भाईंदर ते डहाणूपर्यंत वेगळया पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करणे याबाबत श्री. मुझफ्फर हुसेन वि.प.स. यां□ दिलेली विशेष उल्ले□ची सूच□.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. मुझफ्फर हुसेन ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"ठाणे जिल्हयातील मीरा-भाईंदर ते डहाणू पर्यंतच्या क्षेत्रामधील लोकसंख्येमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झालेली असून हा संपूर्ण भाग विकसित झाला आहे. या ठिकाणी सामान्य जनतेला गरजेच्या व मनोरंजनासाठी विविध सुविधा निर्माण झाल्या आहेत. शाळा, महाविद्यालय, मार्केट, सिनेमागृह इत्यादी सोयींमध्ये झपाटयाने वाढ होत असून या भागाचे शहरीकरण होत आहे. या भागात अशा चांगल्या गोष्टी निर्माण झाल्यामुळे आणि या भागातील लोकसंख्या झपाटयाने वाढल्यामुळे त्यातून उद्‌भवणाऱ्या विविध पध्दतीच्या गुन्हेगारीत वाढ होत असून त्यामधून चोरी, दरोडे, खून, बलात्कार असे प्रकार होत आहेत. तसेच अतिरेकी संघटनांचाही या भागात सुळसुळाट झाला आहे. या प्रकारांना पायबंद बसण्यासाठी ठाणे ग्रामीण पोलीस यंत्रणा अपूरी पडत असल्यामुळे गुन्हयांचा शोध घेणे, आरोपींना अटक करणे वा कारवाई करणे यामध्ये ठाणे ग्रामीण पोलीस यंत्रणा हतबल झाली आहे. यासाठी ठाणे शहरामध्ये मीरा भाईंदर ते डहाणू पर्यंत वेगळया पोलीस आयुक्तालयाची निर्मिती करावी म्हणून शासनाकडे वेळोवेळी मागणी करण्यात आलेली आहे. परंतु याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केलेली नाही. राज्य शासनाने यासंबंधी तातडीने कार्यवाही करुन ठाणे शहराप्रमाणे मीरा भाईंदर ते डहाणू पर्यंत वेगळया पोलीस आयुक्तालयाची निर्मिती त्वरीत करावी याकरीता मी या विशेष उल्लेखाव्दारे आपणास विनंती करीत आहे."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांच्या राजीनाम्याची घोषणा

उपसभापती : महाराष्ट्र विधान परिषद नियम 266 (5) च्या तरतुदीस अनुसरुन मी सभागृहाला असे कळवितो की, श्री. कन्हैयालाल विशनदास गिडवाणी, विधान परिषद सदस्य यांनी या सभागृहातील त्यांच्या जागेचा दिनांक 30 मे 2006 रोजी मध्यान्हानंतर राजीनामा दिला आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.15 वाजता पुन: भरेल.

(3.46 ते 4.15 मध्यंतर)

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

**सभागृहाचे कामकाज स्थगित करण्या संबंधात**

श्री.पांडुरंग फुंडकर : माननीय उपसभापती महोदय, गेल्या तीन दिवसापासून मुंबईमध्ये सतत मुसळधार पाऊस सुरु आहे. त्यामुळे मुंबई उपनगरामध्ये कालपासूनच रस्ते आणि रेल्वे वाहतूक बंद झालेली आहे. गल्ल्या गल्ल्यांमध्ये कमरेपर्यंत पाणी साचलेले आहे. त्याचबरोबर आज विधिमंडळाचे कर्मचारी, अधिकारी यांना येथे येण्यासाठी तीन-चार तास लागलेले आहेत. अजूनही पाऊस सुरु आहे. पावसामुळे आजचे कामकाज स्थगित करण्याबाबत विधानसभेने निर्णय घेतलेला आहे. मला असे वाटते की, आपल्या सभागृहामध्येही अशाच प्रकारचा निर्णय घ्यावा. आजचे कामकाज स्थगित कारण्याबाबत आपल्या सभागृहाने निर्णय करावा.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, परवा रात्रीपासून मुंबई आणि मुंबईच्या उपनगरामध्ये खूप मोठी पर्जन्य वृष्टी सुरु आहे. उपनगराची परिस्थिती भयानक झालेली आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे एम.एम.आर.डी.ए.ने प्रकल्प हाती घेतल्यामुळे उत्खननातून माती बाहेर काढून टाकलेली आहे. आम्ही या संबंधात तक्रारीही केलेल्या आहेत. त्याचा परिणाम असा झालेला आहे.

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मिठी नदीच्या संबंधात येथे बरीच चर्चा झाली. परंतु मिठी नदीच्या काठावरील जी अतिक्रमणे आहेत, त्यामुळे नदीतील पाणी जाण्यासाठी अडथळे निर्माण झालेले आहेत. त्यामुळे मुंबईमध्ये खूप पाणी जमा झाले. मी आज सकाळी कलिना, सांताक्रुज,अंधेरी येथे पाणी साचलेले आहे. गोरेगाव येथील महानंदा डेरी समोरही पाणी साचलेले आहे. आज सकाळी मला बांद्रा ते विधानभवन पर्यन्त 20 किमी.चे अंतर आहे. परंतु येथे येण्यासाठी मला अडीच तास लागले. विधानमंडळाचे कर्मचारी हे उपनगरामध्ये रहातात. काही कर्मचारी कामावर येऊ शकले नाहीत. मुंबई उपनगरातील सन्माननीय सदस्यही आज येऊ शकलेले नाहीत. विशेषत: बांद्रे येथील शासकीय कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतील तळ मजल्यातील घरांमध्ये पाणी घुसलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये मला असे वाटते की, आजचे सदनाचे कामकाज स्थगित करावे. जे काही आजचे कामकाज राहिलेले आहे ते उद्या घ्यावे. तोपर्यंत पावसाचे प्रमाण काय आहे, याचाही अंदाज घेता येईल. असा सतत पाऊस पडला तर उद्याची परिस्थिती गंभीर होईल, हे निर्विवाद आहे.

(यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

आमच्यासमोर जे दृश्य आहे ते 26 जुलैचे आहे. तसा प्रसंग येऊ नये अशी परमेश्वरचरणी प्रार्थना करु या. त्या त्या भागातील जनतेला सहाय्य करणे, येथील लोकांनी सुरक्षित घरी पोहोचणे ही गोष्ट अतिशय महत्वाची असल्यामुळे आपण आमच्या सूचनेचा, आमच्या विनंतीचा विचार करावा आणि सभागृहाचे आजचे कामकाज या ठिकाणी थांबवून सभागृह स्थगित करावे अशी आमच्या सर्व सहकाऱ्यांच्या वतीने पुन्हा विनंती करतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी मी सहमत आहे. आपल्या सभागृहाचे आपले कामकाज देखील महत्वाचे आहे. आज सकाळी सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. आदिकसाहेबांनी मला सांगितले की, ते सकाळी एकदा आले पण त्यांना वरळीवरुन घरी परत जावे लागले. ते येऊ शकले नाहीत. मी थोडा उशिरा आलो. परंतु आज सतत पाऊस सुरु आहे. कदाचित सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदारसाहेब आणि अन्य लोक आपल्या घरी केव्हा पोहोचतील हे सांगता येत नाही. मी पाहिलेले आहे की, चर्नीरोड स्टेशनला सर्व गाड्या उभ्या आहेत. गाड्या बंद झालेल्या आहेत. मागच्यावर्षी 26 जुलैला जी स्थिती निर्माण झाली होती ती लक्षात घेता आज तशी स्थिती आहे असे वाटत नाही परंतु रेडियो मिरचीवरुन असे सांगण्यात आले की, कुर्ला भागात रेड अलर्ट जाहीर झाला आहे. मिठी नदीच्या पाण्याची पातळी वाढलेली आहे. यानंतर पुन्हा पाचसहा तास पाऊस पडला तर आपले कर्मचारी घरी जाऊ शकणार नाहीत. मुंबईच्या आमदारांना देखील घरी जाणे कठीण होईल. अशा संकटाच्या प्रसंगी आपल्या भागामध्ये जाऊन लोकांना मदत करणे, त्यांना सगळ्या प्रकारचे सहकार्य करणे, त्या ठिकाणी जर कोठे मदत करता आली तर ते कार्य करण्यामध्ये लक्ष घालणे हे स्थानिक आमदारांनी प्राधान्याने करण्याची आवश्यकता आहे. अशी गंभीर परिस्थिती आहे तसेच आपल्या सभागृहातील चर्चा देखील महत्वाची आहे. माझी आपल्याला तसेच माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे. आजचे जे कामकाज असेल ते उद्या करु. उद्याच्या बाबतीत मी विनंती करतो. आज रात्रीचा आणि उद्यापर्यंतचा आपण अंदाज घ्यावा. मला असे वाटते की, आजची स्थिती गंभीर वाटत असेल तर उद्याच्या कामकाजाच्या बाबतीतही जाहीर करावे. आमदारांना परत येण्यामध्येही अडचण आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. नितीन गडकरी ......

हा निर्णय आपण घेऊ शकता. मी आपल्याला विनंती करतो. आपण योग्यवेळी याबाबत निर्णय घ्यावा. परंतु आज सगळ्या प्रकारची चर्चा थांबवून आमदारांनी आपापल्या भागात गेले पाहिजे आणि लोकांना दिलासा दिला पाहिजे. जी सरकारी यंत्रणा आहे, माननीय मुख्यमंत्री आहेत, मंत्री आहेत, आयुक्त आहेत, सचिव आहेत यांनी देखील या कामामध्ये लक्ष घातले पाहिजे. ते दोन्ही कामामध्ये असले तर तिकडे कमी लक्ष जाईल. या परिस्थितीमध्ये सभागृहाचे आजचे सर्व कामकाज स्थगित करुन उद्याच्या कामकाजामध्ये हे कामकाज घ्यावे अशी जी सूचना केलेली आहे ती आपण मान्य करावी. माझी सत्तारुढ पक्षाला विनंती आहे. त्यांनी आता कामकाज करण्याचा कोणताही आग्रह धरु नये. प्रत्येक जण म्हणतो की, शिक्षणाची चर्चा महत्वाची आहे. जी विधेयके आहेत ती चर्चेशिवाय मान्य होणार नाहीत. सभागृहामध्ये प्रत्येकाच्या इन्ट्रेस्टचे वेगवेगळे विषय आहेत. आपण हा विषय घेऊ, तो घेणार नाही असे बोलत राहिलो तर गंभीर स्थितीचे महत्व लक्षात घेतले नाही असे होईल.. बिले मंजूर होतील. आपली बिले कधी थांबलेली नाहीत. सभागृहाचे आजचे कामकाज स्थगित करण्याच्या बाबतीत आपण विचार करावा अशी माझी विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी या ठिकाणी जी सूचना मांडलेली आहे त्याबद्दल जरुर आपण निर्णय द्यावा. तो निर्णय आम्हा सर्वांना मान्य होईल. परंतु त्याच्या अगोदर बाहेर पावसाची काय परिस्थिती आहे आणि मुंबई शहरातील वातावरण काय आहे याबद्दल थोडीशी साशंकता आणि भीतीचे वातावरण मनामध्ये असू नये. उद्या सभागृहाचे कामकाज या कारणामुळे बंद झाले असा मेसेज जाऊन पॅनीक परिस्थिती नागरिकांपर्यंत जाऊ नये यासाठी मी सभागृहात येण्यापूर्वी आताच माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये आपातकालीन व्यवस्थापनाच्या संदर्भात बैठक चालू आहे आणि तेथील माहिती मी घेऊन आलो. सकाळपर्यंत किंवा दुपारी साडेतीन वाजेपर्यंत पावसाचा जोर जास्त होता. परंतु आता पावसाचा जोर कमी होत चालला आहे. काही भागात पाऊस उघडलेला आहे आणि काही भागात पाऊस चालू आहे. हवामान खात्याने येत्या 48 तासामध्ये 250 मिलीमीटर पर्यंत पाऊस होईल असा अंदाज व्यक्त केलेला आहे. लो झोन अशा पध्दतीचे त्यांचे भाकीत आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 16:25

(श्री. हर्षवर्धन पाटील...)

परंतु गेल्या वर्षी 26 जुलैला जी परिस्थिती निर्माण झाली होती तेवढी पॅनिकी परिस्थिती नाही. गेल्या वर्षी ज्या ज्या ठिकाणी अशी परिस्थिती निर्माण झाली होती त्या त्या ठिकाणी महाराष्ट्र शासनाने तसेच मुंबई महानगरपालिकेने आधी पासूनच उपाययोजना केलेली आहे. पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या माध्यमातून दर 15-20 मिनिटांनी प्रत्येक भागामध्ये कशी परिस्थिती आहे यासंदर्भातील माहिती नागरिकांपर्यन्त पोहोचविण्याचे प्रयत्न होत आहेत. पाऊस जास्त झाला ही गोष्ट खरी आहे. परंतु फारच पॅनिकी सिच्युएशन आहे असे नाही. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्या प्रमाणे विधानमंडळ सचिवालयातील अनेक अधिकारी आणि कमर्कचारी दूरवर राहातात. या सदनाचे मुंबईच्या परिसरात राहाणारे सन्माननीय सदस्य देखील दूरवर रहातात. ग्रामीण भागातील सन्माननीय सदस्य हे आमदार निवासामध्ये राहातात. आमदार निवास हे विधान भवन इमारतीपासून लांब नाही. सर्व परिस्थितीची मी माहिती घेतलेली आहे. मदत करणा-या सर्व यंत्रणा सज्ज आहेत. आज कदाचित रात्रभर पाऊस सुरु राहिला तर उद्या पुन्हा प्रश्न निर्माण होईल. प्रशासकीय यंत्रणा, मुंबई महानगरपालिकेची यंत्रणा लोकांच्या मदतीसाठी सज्ज आहेतच. परंतु लोकप्रतिनिधींनाही अशा परिस्थितीमध्ये लोकांना मदत करता यावी यादृष्टीने सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे ती मान्य करायला हरकत नाही. आजचे उर्वरित कामकाज आपण उद्या घेऊ. खालच्या सदनामध्ये विधेयकावर चर्चा सुरु असून या विषयाच्या संदर्भात देखील तेथे चर्चा होऊन कामकाज थांबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. या सभागृहामध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्यास सरकारच्यावतीने पाठिंबा आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, सन्मानीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि सन्माननीय संसदीय कामकाज मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी या सदनामध्ये पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती सांगितली. उपनगर आणि अन्य भागातील अधिकारी आणि कर्मचा-यांना सुध्दा त्या त्या भागात पोहोचणे आवश्यक आहे. विशेषत: मुंबईतील लोकप्रतिनिधींना त्यांच्या विभागामध्ये लवकर पोहोचता आले तर त्यांना लोकांना जास्तीत जास्त मदत करता येईल असे विचार याठिकाणी मांडण्यात आले. अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी शासन कसे सतर्क आहे याबाबत सन्माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय सभापती...)

निवेदन केले. तेव्हा आजचे कामकाज येथे थांबवून उद्याचे कामकाज रीतसर सुरु करण्याचा निर्णय आपण सर्वांनी घेऊ. यदाकदाचित अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली तर त्याबाबतीत सर्वांना कळविण्याच्या दृष्टीने विधानमंडळ सचिवालयाकडून व्यवस्था केली जाईल. आता आजचे कामकाज तहकूब करुन आजच्या कामकाजपत्रिकेवरील राहिलेले संपूर्ण कामकाज हे उद्याच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या बुधवार, दिनांक 5.7.2006 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4 वाजून 29 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 5.7.2006च्या दुपारी 12.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही